
cmyk



दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..! -संपादक

नवी दिशा... नवे विचार.....

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक



जागतिक महिला दिन

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३१० | रविवार दि.०८ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# ३० जूनपुर्वी होणार कर्जमाफी

## पुढची कार्यवाही सुरु, मुख्यमंत्री फडणवीसांची महत्त्वाची माहिती

नागपूर । प्रतिनिधी

**राज्याच्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीची घोषणा झाली असल्यामुळे आता पुढची कार्यवाही सुरु होईल. जुन्या कुठल्याही कर्जमाफीपेक्षा ही चांगली कर्जमाफी असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. ७ मार्च) सांगितले. ते नागपुरात पत्रकारांशी बोलत होते.**



कोणी म्हणते जिल्हा बँकेचे, कोणी म्हणते राष्ट्रीयकृत बँकेचे तसेच सोसायटीचे कर्ज माफ होणार नाही. पण आम्ही दोन लाखांपर्यंत कुठलीही बँक असो ज्यांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, असे कोणीही दिलेले पीक कर्ज असो ते आम्ही माफ करणार आहोत. केवळ आमचा प्रयत्न हा आहे की कर्जमाफी शेतकऱ्याला द्यायची आहे, बँकेला नाही. यामुळे शेतकऱ्याला फायदा झाला पाहिजे, याकरिता आम्ही काम करत आहोत. आम्ही ३० जूनच्या आधी कर्जमाफी करणार आहोत. त्यासाठी आता पुढची कार्यवाही सुरु होईल. कर्जमाफीबाबत स्थापन केलेली समिती यावर काम करत आहे. ही समिती सगळ्या गोष्टी सांगेल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी अर्थसंकल्पातून केली. शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बाबनकुळे यांनी म्हटले ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तेलंगणात १३० माओवाद्यांचे आत्मसमर्पण

हैद्राबादः केंद्र सरकारने दिलेल्या ३१ मार्चच्या अंतिम मुदतीपूर्वी शनिवारी तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवंत रेड्डी यांच्यासमोर १३० माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. आत्मसमर्पण करत माओवाद्यांनी १२४ बंदुका सोपवल्या आहेत, यामध्ये एके–४७ रायफल्ससह विविध कॅलिबरचे ५,२०० हून अधिक जिवंत काडतुसे सोपवली आहेत. डीजीपी बी शिवधर रेड्डी यांनी सांगितले की, आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांपैकी १२५ छत्तीसगडचे, ४ तेलंगणाचे आणि १ आंध्र प्रदेशचा आहे. आता तेलंगणा राज्य माओवाद्यांची समिती नाही. ती पूर्णपणे गायब झाली आहे.

### पुढचे दोन दिवस राज्यात उष्णतेचा हाय अलर्ट

मुंबईः राज्यात आता प्रचंड उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. कमाल तापमानाचा पारा ३६ अंश सेल्सिअस पार करून चाळीशी गाठतानाचे चित्र आहे. दरम्यान हवामान विभागाने पुढील दोन दिवस राज्यभर उष्णतेचे अलर्ट दिले आहेत. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड या जिल्ह्यांना उष्ण व आर्द्र हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील दोन दिवस राज्यभरात कमाल तापमानात वाढ होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मराठवाड्यातही गेल्या चार दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ दिसून आली आहे. बहुतांश ठिकाणी कमाल तापमानाचा पारा हा ३६ ते ३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे.

### तिसरे अपत्य जन्मल्यास २५ हजार

हैदराबादः जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताने चीनला मागे टाकत पहिलं स्थान पटकावले आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात नेहमीच मुले जन्माला घालण्यावरुन चर्चा होत असते. भारत सरकारने हम दो–हमारे दो म्हणत दोन मुलांच्या जन्मासाठीच आग्रह धरला आहे. मात्र, आता आंध्र प्रदेश सरकारकडून तिसऱ्या मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाणार आहे. राज्यातील जन्मदर घटत असल्याने आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी थेट विधानसभेतच याबाबतची घोषणा केली. राज्य सरकारने लोकसंख्येसंदर्भात नवी नीती आखत असून दुसऱ्या आणि तिसऱ्या अपत्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. त्यानुसार, आंध्र प्रदेश सरकार तिसऱ्या अपत्यास २५,००० रुपये प्रोत्साहन अनुदान देणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### शेजारील राष्ट्रांवरील हल्ले थांबवणार; इराणची घोषणा

तेहरानः अमेरिका–इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यांनंतर संतापलेल्या इराणने शेजारील राष्ट्रांवरही हल्ले केले होते. परंतु आता शेजारील राष्ट्रांवर हल्ले करणार नाही असे इराणच्या राष्ट्रपतींनी म्हटले आहे; परंतु त्यासाठी एक अटही ठेवली आहे. जोवर शेजारील राष्ट्रांच्या भूमीचा वापर आमच्यावरील हल्ल्यासाठी केला जात नाही तोपर्यंत आम्हीही या राष्ट्रांवर हल्ला करणार नाही. इराणच्या अंतरिम लीडरशीप कॉन्सिलने याला मंजुरी दिली आहे. त्यामुळे मध्य पूर्वेतील आखाती देशांमधील तणाव कमी होण्याची शक्यता आहे. राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्या हवाल्याने इराणी माध्यमांनी बातमी दिली आहे. त्यानुसार, राष्ट्रपतींनी मागील काही दिवसांपासून शेजारील राष्ट्रांवर केलेल्या हल्ल्याची माफीही मागितली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७१.०० क्विंटल | २,०१० | २,७४० | २,३९० |
| ज्वारी/हायब्रिड: ६६.५० क्विंटल | २,२०० | ३,८०४ | ३,०८२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ७.०० क्विंटल | ६,७०० | ७,५९० | ७,०८५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: १.०० क्विंटल | २,५२० | २,५२० | २,५२० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: ३०.०० क्विंटल | ५,३५० | ५,४०० | ५,३८३ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,४५१ | ४,४५१ | ४,४५१ |

# अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी संसदेत आवाज उठवा

## आ.रोहित पवार यांनी घेतली केजरीवाल यांच्यासह राजद नेत्यांची भेट



नवी दिल्ली । वृत्तसेवा

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी शनिवारी (दि. ७) आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल, खासदार संजय सिंह, राजदचे खासदार मनोज झा यांची भेट घेतली. अजित पवार अपघात प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी संसदेमध्ये आवाज उठवण्याची मागणी यावेळी त्यांनी केली. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयामध्ये (डीजीसीए) मोठ्या बदलांची गरज असल्याची मागणी रोहित पवार यांनी केली. या मागणीला केजरीवाल यांनी सहमती दर्शवली असल्याचे भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना रोहित पवार यांनी सांगितले.

या वेळी रोहित पवारांनी सांगितले की, अजित पवार यांच्या अपघाताबद्दलची ▶▶ पान २ वर

### "राहुल गांधींसह इंडिया आघाडीच्या नेत्यांना भेटणार

अजित पवार यांच्या अपघाताच्या चौकशी संदर्भात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील पक्षांच्या नेत्यांच्या भेटी घेणार असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. १० मार्च रोजी राहुल गांधींची भेट होऊ शकते. तसेच समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, झारखंड मुक्ति मोर्चाचे हेमंत सोरेन, तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, द्रमुकच्या के. कनिमोळी यांच्या भेटी घेणार असल्याचे ते म्हणाले.

# किसान योजनेचा २२ वा हप्ता १३ मार्चला?




दिल्ली । वृत्तसंस्था

**शेतकरी पीएम किसान योजनेच्या २२ व्या हप्त्याची प्रतीक्षा करत आहेत. सुरुवातीला हा हप्ता फेब्रुवारी महिन्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र तो अद्याप जमा झालेला नसल्यामुळे आता १३ मार्च २०२६ ही संभाव्य तारीख चर्चेत आली आहे.**

देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्र सरकारकडून राबवली जाणारी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात दरवर्षी ६ हजार रुपये थेट जमा केले जातात. ही रक्कम तीन हप्त्यांमध्ये म्हणजेच ▶▶ पान २ वर

# गॅस सिलेंडर ६० रुपयांनी महाग

## व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा थांबवण्याचा केंद्राचा निर्णय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अमेरिका–इस्रायल–इराण संघर्षाचे पडसाद आता जगासह भारताच्या बाजारपेठांत उमटताना दिसत आहेत. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी करताच कच्च्या तेलासह एलपीजीचे दर भडकले आहेत. याचा थेट परिणाम भारतात होताना दिसत असून, केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरच्या पुरवठ्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. तर घरगुती गॅस सिलेंडर ६० रुपयांनी महाग झाले आहे.




सरकारने व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबविला आहे. यामुळे देशभरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्री उद्योग ठप्प होण्याची भीती आहे. तसेच यादरम्यान सर्वसामान्यांच्या खिशाला देखील इराण–इस्रायल संघर्षाची झळ बसली असून घरगुती गॅस सिलेंडरच्या किमती ६० रुपयांनी भडकल्या आहेत. यामुळे ८६० रुपयांना मिळणाऱ्या सिलेंडरसाठी महाराष्ट्रात ▶▶ पान २ वर

# मेडिकलच्या विद्यार्थीनीने जीवन संपवलं; राष्ट्रवादीच्या नेत्याविरुद्ध गुन्हा

नांदेड । प्रतिनिधी

महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या युवतीने वसतिगृहातच गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली. शुक्रवारी दुपारी हडको परिसरात ही घटना घडली. या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली असून मुलीच्या पालकांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यावर गंभीर आरोप केले आहेत. त्यानंतर, नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये अखेर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते तथा महापालिका माजी विरोधी पक्ष नेता जीवन घोगरे यांच्यावर अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेडमध्ये होमिओपॅथीचे शिक्षण घेणाऱ्या एका २५ वर्षे विद्यार्थीनीने वसतिगृहात आत्महत्या केल्याची घटना घडली. त्यानंतर, मुलीच्या पालकांनी आणि नातेवाईकांनी जीवन घोगरे यांनीच संबंधित विद्यार्थीनीस आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करत पोलिसांत तक्रार दिली. त्यानुसार, दाखल केलेल्या फिर्यादीतही जीवन घोगरे यांचे नाव घेतले आहे. मुलीच्या वडिलांनी दिलेल्या जबाबानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जीवन घोगरे यांच्या वसतिगृहामध्ये आकांक्षा गायकवाड ही विद्यार्थिनी राहत होती, गेल्या ८ ते १० ▶▶ पान २ वर

# वडिलांचा घटस्फोट किंवा दुसरे लग्न झाले तरी मुलाला अनुकंपाचा हक्क-हायकोर्ट

जोधपूर । वृतसंस्था


पालकांचा घटस्फोट झाला आहे किंवा मुलगा आपल्या मृत वडिलांसोबत राहत नव्हता, या कारणास्तव मुलाला अनुकंपा तत्वावर मिळणारी नोकरी नाकारणे पूर्णपणे चुकीचे आहे. वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या दुसऱ्या पत्नीला नोकरी मिळाली आहे, या कारणास्तव मुलाला अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती नाकारता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल राजस्थान उच्च न्यायालयाने दिला आहे. अनुकंपा तत्त्वारील नोकरी प्रकरणी मुख्य न्यायमूर्ती संजीव प्रकाश शर्मा आणि न्यायमूर्ती बलजिंदर संधू यांच्या खंडपीठाने राज्य सरकारने दाखल केलेली यचिका फेटाळून लावली. संबंधित तरुणाच्या वडिलांच्या निधनानंतर त्याने अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केला होता, जो प्रशासनाने ▶▶ पान २ वर

# मुकेश अंबानी पुन्हा आशियाचे 'सम्राट'!

## देशातील अब्जाधीशांची संख्या आता ३०८ वर, गौतम अदानी दुसऱ्या स्थानावर

मुंबई । प्रतिनिधी

'हुरुन ग्लोबल रिच लिस्ट २०२६' नुसार जगातील श्रीमंतांची नवीन यादी जाहीर झाली असून, यात भारताने भरारी घेतली आहे. देशातील अब्जाधीशांची संख्या आता



३०८ वर पोहोचली असून, चीन आणि अमेरिकेनंतर भारत जगात तिसऱ्या स्थानावर आहे. जागतिक स्तरावर प्रथमच अब्जाधीशांची संख्या ४,००० च्या पार गेली असून, एकूण ४,०२० अब्जाधीशांची नोंद झाली आहे.


रिपोर्टनुसार, यंदा भारतात २४ नवीन अब्जाधीश जोडले गेले आहेत, तर ५७ नवीन व्यक्तींनी पहिल्यांदाच या यादीत स्थान मिळवले आहे. भारतीय अब्जाधीशांची एकूण संपत्ती १० टक्क्यांनी वाढली असून, तब्बल ११२.६ ▶▶ पान २ वर

# 'स्क्रीन टाईम'चा मुलांच्या वर्तणुकीवर परिणाम

## तज्ज्ञांकडून गंभीर इशारा, दुर्लक्ष न करण्याचा पालकांना सल्ला

मुंबई । प्रतिनिधी

**मोबाईल, टॅब आणि टीव्हीसमोर जास्त वेळ घालवणाऱ्या मुलांमध्ये दिवसेंदिवस स्वभावातील आक्रमकपणा, चिडचिड, नैराश्य, एकाग्रतेचा अभाव दिसून येतो आणि वर्तणुकीतील समस्यांमध्येही वाढ होत असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली. शारीरिक हालचालींचा अभाव आणि डिजिटल साधनांचा वाढता वापर हे यामागील प्रमुख घटक आहेत.**



डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार वाढता स्क्रीन टाईम थेट मुलांच्या मेंदूवर परिणाम करतो. डिजिटल कंटेंट मेंदूतील 'रिवॉर्ड सिस्टीम' सतत सक्रिय ठेवतो, ज्यामुळे डोपामाईनचे प्रमाण वाढते आणि मुलांना सतत उत्तेजनाची सवय लागते. दर महिन्याला ४ ते १४ वयोगटातील सुमारे ८ ते १० मुलांमध्ये आक्रमकपणा, चिडचिड होणे, झोपेच्या तक्रारी, एकाग्रतेचा अभाव आणि एकाकीपणा अशा समस्या उद्भवत आहेत. वाढत्या स्क्रीन टाईममुळे मुलांची त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी होते. संवाद कमी झाल्याने भाषेच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. तसेच, सायबरबुलिंग किंवा चुकीच्या ऑनलाईन कंटेंटमुळे मुलांच्या आत्मविश्वासावर ▶▶ पान २ वर

# सरकारविरोधात काँग्रेसची ९ मार्चला कळमनुरी ते हिंगोली पदयात्रा



हिंगोली । प्रतिनिधी

केंद्रातील मोदी सरकार हे शेतकरी विरोधी असून अमेरिकेबरोबर केलेल्या व्यापार करारामुळे देशातील शेतकरी व कृषी क्षेत्र देशोधडीला लागणार आहे. आधीच अस्मानी सुलतानी संकटात पिचलेल्या शेतकऱ्यांसाठी व्यापारी करार हा मोठा आघात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेसमोर सपशेल शरणांगती पत्करली असून या करारामुळे भारतातील शेतमालाला भाव मिळणार नाही परिणामी शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची भिती आहे. ग्रामीण भागातील गरिब, कष्टकऱ्यांसाठी युपीए सरकारने आणलेली मनरेगा ही हक्काची रोजगार ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# पवारांचा सहावा कार्यकाळ : अनुभवाचा सन्मान की नव्या नेतृत्वाचा अभाव?

महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून द्यावयाच्या सात जागांसाठी यंदा अपेक्षेप्रमाणे चुरशीची लढत झाली नाही. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यातील ताकदीचे गणित पाहता दोन्ही बाजूंनी दोन हात करण्याची शक्यता असली, तरी शेवटी ही निवडणूक बिनविरोध पार पडली. त्यामुळे राजकीय संघर्षाऐवजी समतोल साधण्याचा मार्ग निवडला गेला, असे म्हणावे लागेल. मात्र या प्रक्रियेत काही महत्त्वाचे राजकीय संकेतही समोर आले. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांना पुन्हा एकदा राज्यसभेत पाठवण्याचा निर्णय हा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला.

पवार यांचे वय नव्वदीच्या उंबरठ्यावर असताना त्यांना आणखी सहा वर्षांसाठी संसदेत पाठवण्याचा निर्णय घेतला गेला. त्यामुळे सक्रिय राजकारणासाठी काही वयोमर्यादा असाव्यात का, या चर्चेला नव्याने तोंड फुटले आहे. पवार यांचे राजकीय अनुभव, संघटनकौशल्य आणि राष्ट्रीय पातळीवरील संपर्क या गोष्टी अजूनही प्रभावी आहेत, यात शंका नाही. परंतु, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीही त्यांना स्वतः उपस्थित राहता आले नाही, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येत नाही. देशातील राजकारणात वरिष्ठ नेत्यांच्या अनुभवाची गरज असली तरी नेतृत्वाच्या पिढीगत संक्रमणाचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे.

राज्यसभेच्या या निवडणुकीने आणखी एक वास्तव अधोरेखित केले, ते म्हणजे महाविकास आघाडी या आघाडीतील अंतर्गत मतभेद. २०१९ मध्ये भाजपला रोखण्यासाठी निर्माण झालेली ही आघाडी कालांतराने सत्तेपासून दूर गेल्यानंतर कमकुवत होत चालल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही या आघाडीचे अस्तित्व फारसे जाणवले नाही. त्यामुळेच राज्यसभेच्या उमेदवारीच्या वेळी तिन्ही पक्षांमध्ये मतभेद उफाळून आले. काँग्रेस आणि शिवसेना या घटकपक्षांना पवारांच्या उमेदवारीबाबत सुरुवातीला फारसा उत्साह नव्हता.

काँग्रेसच्या राज्य पातळीवरील नेत्यांना पवारांच्या पक्षाचे केंद्रातील सत्ताधारी नॅशनल डेमोक्रॅटिक आलिअन्सशी जुळवून घेण्याचे संकेत खटकत होते. त्यातच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चांमुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र दिल्लीतील काँग्रेस नेतृत्वाने हिरवा कंदील दिल्यानंतर राज्यातील विरोध शमला. या प्रक्रियेत सर्वाधिक अडचणीत सापडला तो शिव सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष. पक्षातील वेगवेगळ्या गटांमध्ये मतभेद स्पष्टपणे दिसून आले. एका बाजूला संजय राऊत यांनी पवारांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला, तर दुसऱ्या बाजूला आदित्य ठाकरे आणि वरुन सरदेसाई यांच्या गटाने वेगळे मत मांडले. शेवटी राऊत यांच्या भूमिकेचा प्रभाव अधिक ठरला आणि पवारांच्या उमेदवारीचा मार्ग मोकळा झाला. दरम्यान सत्ताधारी आघाडीतील पक्षांनीही काही अनपेक्षित निर्णय घेतले. भारतीय जनता पार्टी ने प्रसिद्ध किंवा चर्चेतील व्यक्तींऐवजी कार्यकर्त्यांना संधी देण्याचा प्रयत्न केला. नागपूरच्या माजी महापौर माया इवदाते आणि मराठवाड्यातील ओबीसी नेते रामराव वडकुते यांची निवड याचे उदाहरण म्हणता येईल. संघटनात्मक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संसदेत पाठवण्याचा हा प्रयत्न स्वागतार्ह ठरू शकतो.त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने सोलापूरच्या प्राध्यापक आणि पत्रकार असलेल्या डॉ.ज्योती वाघमारे यांना उमेदवारी देऊन सामाजिक प्रतिनिधित्वाचा संदेश दिला. मागासवर्गीय समाजातील एक उच्चशिक्षित महिला संसदेत पोहोचणे हे संसदीय चर्चेच्या गुणवत्तेसाठी सकारात्मक ठरू शकते.

भाजपकडून दीर्घकाळ संघटनात्मक काम करणाऱ्या विनोद तावडे यांनाही अखेर संसदीय पद मिळाले. अनेक वर्षे पक्षासाठी काम करूनही त्यांना मोठी राजकीय संधी मिळालेली नव्हती. आता राज्यसभेच्या माध्यमातून त्यांना राष्ट्रीय पातळीवर भूमिका बजावण्याची संधी मिळणार आहे. तर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनाही आणखी एक कार्यकाळ देण्यात आला. यामागे केंद्रातील आघाडीच्या राजकारणातील समतोल राखण्याची गरज दिसून येते.

या संपूर्ण प्रक्रियेचा सार असा की, राज्यसभेची ही निवडणूक जरी बिनविरोध झाली असली तरी तिच्यामागे अनेक राजकीय समीकरणे दडलेली आहेत. एका बाजूला महाविकास आघाडीतील अंतर्गत मतभेद उघड झाले, तर दुसऱ्या बाजूला सत्ताधारी आघाडीने सामाजिक समतोल राखण्याचा प्रयत्न केला. वरिष्ठ नेतृत्वाच्या अनुभवाला मान देताना नव्या पिढीला संधी देण्याचा प्रश्नही या निमित्ताने पुढे आला आहे.

लोकशाहीत सत्तासंतुलन, सामाजिक प्रतिनिधित्व आणि नेतृत्वातील पिढीगत बदल या तीनही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या असतात. महाराष्ट्रातील या राज्यसभा निवडणुकीने या तिन्ही मुद्द्यांवर विचार करण्याची संधी दिली आहे. भविष्यातील राजकारण कोणत्या दिशेने जाईल, हे ठरवताना या घटनांचे संकेत दुर्लक्षित करता येणार नाहीत.

# आज स्त्री होऊ या....!

**आज ८ मार्च जागतिक महिला दिनाला हे वाचून काहीसे आश्चर्य वाटेल पण हा मुद्दा नीट समजून घ्यावा। रजनिश म्हणतात ''करुणा, प्रेम, अहिंसा, सेवा हे स्त्रीत्वाचे गुणविशेष आहेत. आणि हिंसा ,कठोरता, हे सारे पुरुषी गुण आहेत. या दोन्ही प्रकारच्या गुणांचा स्त्री किंवा पुरुषांच्या शरीराशी काहीही संबंध नाही. हे गुण दोन्हीही प्रकारच्या व्यक्तीत असू शकतात. दोन्ही प्रकारचे गुण एकाच व्यक्तींत सुध्दा असू शकतात पण जे गुण जास्त प्रभावी असतील ती व्यक्ती त्या प्रकारची समजावी. म्हणजे एखाद्या स्त्रीमध्ये कठोरता असेल तर ती पुरुषप्रधान गुणांची आहे आणि एखादा पुरुष स्त्री गुण असलेला आहे तर त्या व्यक्तीला स्त्रीप्रधान गुणांचा मानावा. ( येथे परत एकदा सांगते की करुणा, प्रेम, अहिंसा, सेवा हे गुण म्हणजेच स्त्रीत्वाचा आविष्कार आणि हिंसा व कठोरता म्हणजेच पुरुषत्व हे लक्षात आले की हे का लिहिले आहे हे लवकरच कळेल )**

इतके थेट स्पष्ट केल्यावर रजनिश बुद्धांचे उदाहरण देतात ते म्हणतात की बुद्धांचा प्रवास हा पुरुष मूल्यांकडून स्त्री मूल्यांकडे होतो आहे. राजा अशोकाचा प्रवास हा त्याच प्रकारचा आहे. त्यामुळे स्त्री मूल्ये ही मानवतावादी मूल्ये आहेत आणि तीच आध्यात्मिक मूल्ये आहेत. आपल्यातील मनुष्यत्वाला ती उन्नत करणारी मूल्ये आहेत. ते उदाहरण देतात की राम, कृष्ण, महावीर ,बुद्ध यांची चित्र पुरुष असूनही दाढी मिशा नसलेली काढली जातात किंबहुना स्त्रीप्रधान सुंदरतेने काढली जातात याचे कारण त्या व्यक्तीचा प्रवास हा स्त्री प्रधानतेकडे झालेला आहे हे दाखविले जाते. म्हणून हिंसा करणारा योद्धा हा दाढी मिशा असलेला आणि संत हा स्त्री चेहऱ्यातच दाखविण्यामागे ही मूल्यांची वाटणी आहे. महाराष्ट्रात '' ज्ञानेश्वर माऊली '' हा शब्दप्रयोग कुणाला खटकत नाही आणि एका पुरुषाला माऊली का म्हटले जाते याचे उत्तर मिळते आणि ज्ञानेश्वरांचे चित्र हे मिशा दाढी नसलेले व सुंदर का दाखविले जाते याचे उत्तर मिळेल. साने गुरुजींना महाराष्ट्राची माऊली म्हटले जाते ते यामुळेच. साने गुरुजी यांचे व्यक्तिमत्व रजनिश म्हणतात त्याप्रकारचे आहे व आंदोलनात ते पुरूष गुण ही व्यक्त करीत अमृता प्रीतम आणि इमरोज नात्यात इमरोज ची जास्त चर्चा होते याचे कारण इमरोज याने ही स्त्री प्रधान गुण खूप उत्कृटतेने आत्मसात केले आहेत आणि स्वामित्व भावना या पुरुषी गुणाच्या वर उठून स्त्रीप्रधान समर्पणाची आणि प्रेमाची चरणसीमा गाठून दाखवली आहे त्यामुळे आपण सारे कोमल होऊ या। स्त्री गुण आत्मसात करू या एवढेच जर या महाराष्ट्राच्या लोकांच्या लक्षात आले तर आज सुरू असलेल्या कुटुंबातील व समाजातील अनेक समस्या सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत होईल म्हणून आपण महाराष्ट्र राज्यातील सर्वचजण आज संकल्प करुया आणि आपल्या समस्या आपणच सोडवुया हिच आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करते



सौ.आशाताई बाजीराव ढाकणे

# नवा काळ, नवी आव्हाने आणि लढणारी ती

नवा काळ म्हणजे बदलांचा काळ. प्रत्येक बदल हा नवीन संधी आणि आव्हाने घेऊन येतो. आधुनिक युगात स्त्रियांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते, परंतु ती आपल्या संघर्षाने आणि आत्मविश्वासाने त्यावर मात करत आहे. आजची स्त्री ही केवळ घराची चौकट सांभाळणारी नाही, तर समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले योगदान देणारी आहे. तिचा प्रवास संघर्षमय असला तरी तिच्या धैर्याने ती नवनवीन शिखरे गाठत आहे.



**स्त्रीच्या संघर्षाचा इतिहास**

भारतीय समाजात स्त्रीला प्राचीन काळापासूनच दुय्यम स्थान दिले गेले. तिच्यावर अनेक बंधने होती, आणि तिच्या स्वातंत्र्यावर मर्यादा होत्या. शिक्षण, रोजगार, आणि सामाजिक सहभाग यामध्ये तिची भूमिका फारच मर्यादित होती. परंतु काळाच्या ओघात स्त्रीने या बंधनांना तोडून आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. स्त्री चळवळींनी समाजात मोठे बदल घडवून आणले.राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले,डॉ बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा गांधी, डॉ राजेंद्र प्रसाद यांनी स्त्रीयांची गुलामगिरी नष्ट व्हावी याकरिता प्रयत्न केले.डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तर हिंदू कोडं बिल मांडून स्त्रियांना त्यांचे कायदेशीर अधिकार घटनेद्वारे दिले.

**शिक्षणाची क्रांती आणि स्त्री**

शिक्षण हे स्त्रीसाठी बदलाचे पहिले पाऊल ठरले. शिक्षणामुळे स्त्रीला स्वतःचे विचार मांडण्याची ताकद मिळाली. सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या क्रांतिकारक स्त्रियांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रीला आत्मनिर्भर बनवण्यासाठी मोठे योगदान दिले. आजच्या काळात स्त्रिया डॉक्टर, इंजिनियर, वकील, वैज्ञानिक, शिक्षक अशा अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करत आहेत.

**कामाच्या ठिकाणी आव्हाने**

कामाच्या ठिकाणी स्त्रियांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. लैंगिक भेदभाव, वेतन असमानता, आणि सुरक्षिततेचा प्रश्न हे अजूनही मोठे आव्हान आहेत. तरीही, स्त्रिया आपल्या मेहनतीने आणि कौशल्याने या समस्यांवर मात करत आहेत. अनेक मोठ्या कंपन्यांच्या उच्च पदांवर स्त्रिया काम करताना दिसतात, जसे की इंदिरा नूई, किरण मुझुमदार शॉ यांसारख्या महिलांनी उद्योग क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे.

**समाजातील रूढीवादी मानसिकता**

आजही समाजात काही ठिकाणी स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. तिच्यावर अनेक बंधने लादली जातात. परंतु आधुनिक स्त्रीने या रूढीवादी विचारसरणीला आव्हान दिले आहे. ती आपल्या विचारांनी आणि कृतींनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणत आहे.

**राजकारणातील स्त्री**

भारतीय राजकारणात स्त्रियांनी आपले योगदान देऊन समाजाला नवी दिशा दिली आहे. सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, सुषमा स्वराज यांसारख्या स्त्रियांनी राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज अनेक स्त्रिया स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत आणि निर्णय प्रक्रियेत योगदान देत आहेत.

**स्त्रीसाठी आधुनिक काळातील आव्हाने**

नव्या युगात स्त्रीला अनेक आव्हाने आहेत. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, लैंगिक अत्याचार, मानसिक आरोग्याचा प्रश्न, आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळत करिअर घडवण्याचा संघर्ष हे मोठे आव्हान आहेत. परंतु स्त्रीने स्वतःला मजबूत बनवून या आव्हानांवर मात केली आहे.

**स्त्रीच्या यशाच्या कथा**

आज अनेक स्त्रिया आपल्या कर्तृत्वाने जगभरात प्रसिद्ध आहेत. मिताली राज, पी. व्ही. सिंधू, मेरी कोम यांसारख्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात भारताला अभिमान वाटावा असे यश मिळवून दिले आहे. तर कल्पना चावला, सुनीता विल्यम्स यांसारख्या महिलांनी अंतराळ क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे.

**स्त्री–पुरुष समानता**

स्त्री–पुरुष समानतेसाठी अनेक चळवळी झाल्या आहेत, आणि त्याचा सकारात्मक परिणाम समाजावर दिसतो आहे. स्त्रियांना अधिकाधिक स्वातंत्र्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी दिल्या जात आहेत. परंतु अजूनही काही ठिकाणी या समानतेसाठी संघर्ष चालू आहे.

**आजची स्त्री: संघर्ष आणि यश**

आजची स्त्री ही एक लढणारी योद्धा आहे. ती आपल्या कुटुंबासाठी आधार आहे, समाजासाठी प्रेरणा आहे, आणि देशासाठी अभिमान आहे. तिच्या कर्तृत्वाने आणि धैर्याने ती प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे. नवा काळ स्त्रीपुढे नवी आव्हाने उभा करत आहे, परंतु ती या आव्हानांना सामोरी जात आहे. तिच्या संघर्षाने आणि आत्मविश्वासाने ती प्रत्येक अडचणींवर मात करत आहे. आजची स्त्री ही केवळ चूल व मुलं सांभाळणारी नाही, तर समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले योगदान देणारी आहे. तिचा लढा आणि यश हे सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.



डॉ.राजेश मधुकरराव इंगोले
मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ

## सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची 'विकसित भारत: युथ पार्लमेंट'साठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

**भारत सरकारच्या 'विकसित भारत २०२६' या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी श्री बंकटस्वामी महाविद्यालय बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय 'युथ पार्लमेंट' (युवा संसद) स्पर्धेत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य् ? महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांने घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील सिध्दार्थ श्रीकिसन वाघमारे यांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली आहे.**

युवा पिढीला संसदेची कार्यप्रणाली कळावी आणि देशाच्या धोरण निर्मितीत तरुणांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी 'विकसित भारताचा रोडमॅप', 'तंत्रज्ञान आणि युवाशक्ती', आणि 'शाश्वत विकास' यांसारख्या विषयांवर आपले परखड विचार मांडले. सदर निवड प्रक्रिया ही वक्तृत्व, गटचर्चा आणि



विषयाचे सखोल ज्ञान या निकषांवर आधारित होती. यामध्ये महाविद्यालयातील सिध्दार्थ वाघमारे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. निवड झालेले विद्यार्थी आता पुढील राज्यस्तरावर महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर , संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपा क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, डॉ. खान ए.एस., डॉ. नारायण काकडे, प्रा. जालिंदर कोळेकर, डॉ. पद्माकर ससाणे, डॉ. सतिष माऊलगे, डॉ. सय्यद इमाद, डॉ. पल्लवी इलापल्ले, डॉ. श्रीमंत तोंडे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. ''आमच्या विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार हे विकसित भारताच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे,'' अशा शब्दांत प्राचार्यांनी गौरव केला. या यशासाठी त्यांना विभाग प्रमुख तथा कार्यक्रमाधिकारी डॉ. यादव घोडके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे बांगरवाडा येथील श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संतसेवा आश्रम येथे आयोजित करण्यात आलेला भव्य मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा गुरुवार दिनांक ५ मार्च रोजी संपन्न झाला.भगवान श्रीकृष्ण,तपोनिधी ईश्वर भारती महाराज, वाचासिद्धि श्रीसंत बप्पाजी बाबा, वैराग्याचे महामेरू श्रीसंत वामनभाऊ,ऐश्वर्यसंपन्न श्रीसंत भगवान बाबा इत्यादी संतांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. ब्रम्हवृंदांच्या उपस्थितीत, वेदमंत्रोच्चारामध्ये मंगलमय वातावरणात हा सोहळा पार पडला. यावेळी श्रीक्षेत्र भगवानगडाचे चौथे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत कृष्णा महाराज शास्त्री, बेलेश्वर संस्थानचे ह.भ.प.महंत महादेव महाराज भारती, महादेव मळी कुर्ला संस्थानचे महंत श्री.ह.भ.प.दत्ता



महाराज बडगे,श्री.ह.भ.प.सुनील महाराज केकान,अनंत महाराज मुळे,भारतीय क्रिकेटपटू श्री संजयजी बांगर यांचे वडील श्री.बापुराव गणपतराव बांगर,श्री.मारोतराव वनवे (माजी सरपंच पाटोदा) श्री.शरदजी बडगे साहेब(भाजपा विस्तारक, बीड)श्री. पंडितजी माने साहेब(शिवसंग्राम,बीड) श्री.अमोल माने (माजी सरपंच पाटोदा) डॉ. अभय वनवे (भाजप) यावेळी परिसरातील सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.आणि पंचक्रोशीतील शेकडो भाविक भक्त उपस्थित होते.यावेळी श्रीक्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी श्री.ह.भ.प.महंत कृष्णा महाराज शास्त्री यांनी आशीर्वाचनरूपी मनोगत व्यक्त केले. महंत दत्ता महाराज बडगे यांची प्रवचनरूपी सेवा पार पडली.आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पान १ वरून...

### ३० जूनपुर्वी होणार

आहे. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या आयुष्यात नव्या आशेचा किरण निर्माण होईल. शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल जाणून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी घेतलेला हा निर्णय निश्चितच शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

----------

### किसान योजनेचा २२

प्रत्येकी २ हजार रुपयांच्या स्वरूपात दिली जाते. मिळालेल्या माहितीनुसार, १३ मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आसाममधील कोक्राझार येथे दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि घोषणांचा कार्यक्रम आयोजित केला जाऊ शकतो. अशा कार्यक्रमांमध्ये पंतप्रधान अनेकदा सरकारी योजनांचे लाभार्थींच्या खात्यात पैसे जमा करतात. यामुळेच या कार्यक्रमादरम्यान पीएम किसान योजनेचा २२वा हप्ता जाहीर केला जाऊ शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे. जर असे झाले, तर देशभरातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरच्या माध्यमातून २ हजार रुपये जमा केले जाऊ शकतात. मात्र या संदर्भात अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

-------------

### अजित पवारांच्या विमान अपघात

सर्व माहिती अरविंद केजरीवाल यांना दिली. त्यांनी संपूर्ण माहिती समजून घेतली. यानंतर चर्चा झाल्याचे ते म्हणाले. अद्याप या प्रकरणात एफआयआर दाखल झाला नसल्याने केजरीवाल यांनी आश्चर्य व्यक्त केले. राम मोहन नायडू यांनी राजीनामा झाला पाहिजे, यासाठी केजरीवाल यांच्यासोबत चर्चा केली असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्रात इतक्या मोठ्या नेत्याला न्याय मिळत नाही. म्हणून संसदेच्या अधिवेशनात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या पक्षांच्या नेत्यांची भेट घेत आम्ही हा मुद्दा सभागृहात उचलला जावा यासाठी विनंती केली. अजित पवार यांना न्याय मिळावा म्हणून तुम्ही जे काम करत आहात त्याला आम्ही साथ देऊ, असे केजरीवाल यांनी म्हटले असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. व्हीएसआर विमान कंपनी आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचा थेट संबंध असल्याचा पुनरुच्चार रोहित पवार यांनी केला. आंध्र प्रदेशमध्ये जाऊन यासंबंधी पुरावे दाखवायला तयार आहे, या विषयावर आमने–सामने चर्चा करायला तयार आहे, असे आव्हान त्यांनी दिले. केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू यांच्या कार्यालयात समोर बसून चर्चा करायला तयार असल्याचे ते म्हणाले. मी थेट बोलत आहे; मात्र ते सूत्रांच्या हवाल्याने बोलत आहेत, असे रोहित पवार म्हणाले. बडे लोक व्हीएसआरच्या पाठीमागे आहेत, म्हणून कंपनीचा मालक व्ही. के. सिंग यांना वाचवले जात असल्याच्या आरोपाचा पुनरुच्चारही त्यांनी केला.

-----------

### मेडिकलच्या विद्यार्थीनीने जीवन

महिन्यांपासून त्यांना फीस भरा म्हणून जीवन घोगरे त्रास देत होते. त्यामुळेच, माझ्या मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची तक्रार मुलीचे वडील मुंजाजी गायकवाड यांनी केली आहे. त्यानुसार शुक्रवारी रात्री ग्रामीण पोलिस ठाण्यात राष्ट्रवादीच्या नेत्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे आणि अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

------------

### गॅस सिलेंडर ६०

९२० रुपये मोजावे लागणार आहेत. १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरसाठी नवे दर शनिवारपासून लागू झाले आहेत. घरगुती गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, खबरदारीचा उपाय म्हणून केंद्र सरकारने तातडीने सर्व रिफायनरी यांना एलपीजीचे उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे रिफायनरी कंपन्या त्यांच्याकडील प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर फक्त स्वयंपाकाचा गॅस बनवण्यासाठी करतील. मात्र आत्ताच्या घडीला घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ सरकारने केली आहे. परिणामी राज्यात नागरिकांना गॅस सिलेंडर ९२० रुपयांना घ्यावा लागणार आहे.

---------------

### मुकेश अंबानी पुन्हा

लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. रिलायन्सचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी ९.८ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह भारत आणि आशियातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती ठरले आहेत. त्यांच्या संपत्तीत ९ टक्क्यांची वाढ झाली. तर गौतम अदानी ७.५ लाख कोटींच्या संपत्तीसह दुसऱ्या स्थानावर आहेत. मात्र, त्यांच्या एकूण संपत्तीत १४ टक्के एवढी मोठी घट नोंदवण्यात आली आहे. भारतातील टॉप–१० श्रीमंतांच्या यादीत मुकेश अंबानी आणि गौतम अदानी यांच्यानंतर, रोशनी नादर मल्होत्रा (३.२ लाख कोटी) या पहिल्या १० मध्ये समाविष्ट असणा–या एकमेव महिला आहेत. तर सायरस पूनावाला यांच्या संपत्तीत सर्वाधिक ४४ टक्क्यांची वाढ होऊन ती ३ लाख कोटींवर पोहोचली आहे. कुमार मंगलम बिर्ला (२.५ लाख कोटी), दिलीप संघवी (२.३ लाख कोटी), अझीम प्रेमजी (२.३ लाख कोटी), नीरज बजाज (२.२ लाख कोटी), अशोक हिंदुजा (२.२ लाख कोटी) आणि राधाकिशन दमानी (१.५ लाख कोटी) यांचा समावेश आहे. भारतात ९५ अब्जाधीशांसह मुंबई हे सर्वांत श्रीमंत शहर ठरले असून, जागतिक स्तरावर मुंबई सहाव्या क्रमांकावर आहे. तर जागतिक पातळीवर एलॉन मस्क हे जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती बनले असून, त्यांच्या पाठोपाठ जेफ बेझोस आणि लॅरी पेज यांचा क्रमांक लागतो.

---------------

### वडिलांचा घटस्फोट किंवा दुसरे लग्न

नाकारला होता. या निर्णयाविरोधात त्याने याचिका दाखल केली होती. एकल खंडपीठाने त्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर, राज्य सरकारने या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

-------------

### सरकारविरोधात काँग्रेसची ९ मार्चला

देणारी योजनाही भाजपा सरकारने मोडीत काढली आहे. केंद्रातील भाजपा सरकारबरोबरच राज्यातील भाजपा महायुतीचे सरकारही शेतकरी विरोधी असून गरज नसताना शक्तीपीठ महामार्ग प्रकल्प आणून शेत जमीन बळकावण्याचा प्रयत्न सुरु आहे. शेतकऱ्यांचा या शक्तीपीठाला तीव्र विरोध आहे पण सरकार मात्र या विरोधाकडे कानाडोळा करून त्यांच्या लाडक्या उद्योगपती मित्रासाठी शक्तीपीठ महामार्ग करण्यासाठी पोलीस बळाचा वापर करत आहे. भाजपा सरकारच्या या जुलमी, अत्याचारी, शेतकरी विरोधी धोरणाविरोधात काँग्रेस पक्षाने एल्गार पुकारला असून ९ मार्च रोजी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली कळमनुरी ते हिंगोली पदयात्रा काढण्यात येणार आहे. अमेरिकेबरोबरचा व्यापार करार, मनरेगा, शक्तीपीठ महामार्ग या प्रमुख मागण्याबरोबरच आदिवासी विशेष पदभरती, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी, घरकुल योजना या मागण्यासाठीही हा महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्याकडे या यात्रेच्या समन्वयाची जबाबदारी असून प्रदेश उपाध्यक्ष सचिन नाईक यांच्यासह हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

----------

### स्क्रीन टाईम'चा मुलांच्या

त्याचा परिणाम होतो. तज्ज्ञांच्या मते, या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास पुढे नैराश्य, आत्मविश्वास कमी होणे आणि कुटुंबातील तणाव वाढू शकतो. मात्र, वेळीच उपचार केल्यास मुलांच्या वर्तणुकीत सुधारणा शक्य आहे. मुलांच्या वर्तणुकीत बदल जाणवल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. स्क्रीनचा मर्यादित वापर, सक्रिय जीवनशैली आणि पालकांकडून मानसिक आधार मिळाल्यास मुलांचे मानसिक आणि शैक्षणिक आरोग्य सुरक्षित राहते. वाढत्या स्क्रीन टाईममुळे मुलं आपल्या कुटुंबापासून दूर राहू लागतात, अभ्यासात मागे पडतात आणि गॅझेट्स हातातून काढून घेतल्यावर संताप व्यक्त करतात. दर महिन्याला ४ ते ५ मुले ही एकाग्रता कमी होणे, डोकेदुखी, कल्पनाशक्तीचा अभाव आणि कुटुंबीयांशी कमी संवाद अशा तक्रारींसह येतात. यामुळे वेळीच पालकांनी लक्ष द्यावे.

---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ८ मार्च २०२६



## थोडक्यात



### जिल्हास्तरीय समूह गायन स्पर्धेत पिंपरगव्हाण शाळा संघ सर्वप्रथम

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद, शिक्षण विभाग (प्राथमिक ) बीड यांच्यावतीने संपन्न झालेल्या जिल्हा स्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा २०२५ – २६ अंतर्गत बीड तालुक्यातील पिंपरगव्हाण शाळेच्या संघास श्रीम. मीनाक्षी होळकर यांच्या मार्गदर्शनात सादर केलेल्या समूह गीतास जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

बीड जिल्हा स्काऊट भवन येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ . किरण कुंवर, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांच्या हस्ते जि.प. पिंपरगव्हाण शाळेतील विद्यार्थी सौरभ अशोक आगाम, सार्थक संतोष लव्हुगळे, सार्थक मच्छिंद्र वैद्य, शिवम संतोष ठाकर, संग्राम ज्ञानेश्वर आगाम, शिवराज शामसुंदर दिवटे, समर्थ लक्ष्मण कांबळे, आदित्य तुळशीदास कांबळे, सार्थक बाळू कोटूळे, सूरज संदीपान भोंडवे, कृष्णा रामदास भुईभार या विद्यार्थ्यांनी समूह गीत सादर केले होते. या यशाबदल उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रणिता गंगाखेडकर, शाळेच्या मुख्याध्यापिका .श्रीम. मुंढे मॅडम, शाळेतील शिक्षिका श्रीम. चव्हाण मॅडम, देबडे मॅडम, सानप मॅडम, शेळके मॅडम, धनवडे मॅडम आदिंनी विजेत्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर कोटुळे सरांनी केले.

### योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये राज्यस्तरीय क्रीडास्पर्धा उत्साहात



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक या विभागामध्ये दिनांक ६ व ७ मार्च रोजी इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन अंतर्गत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ संलग्न संस्थांमधील पॉलिटेक्निकमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय चेस व कॅरम या क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या स्पर्धेचे उदघाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक तसेच पॉलीटेक्निक विभागाचे प्रभारी प्रताप पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी प्रताप पवार यांनी विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांचे अभियांत्रिकी शिक्षणात महत्त्व सांगून शुभेच्छा दिल्या. स्पर्धेसाठी उपस्थित विविध महाविद्यालयांच्या क्रीडा प्रमुखांना सन्मानित करण्यात आले.प्रास्तविक प्राचार्य डॉ.रमण देशपांडे यांनी तर संचलन डॉ.संकेत तोरंबेकर,आभार अतूल फड यांनी मानले.विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल यो.शि.संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर यांच्यासह विभागप्रमुख प्रा.रोहित कदम,प्रा.नारायण सिरसाट,प्रा.अतुल फड, प्रा.श्याम गडदे प्रा.बप्पासाहेब सोनवणे इतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

## महसूल सेवा गावपातळीवर; शेतकरी, नागरिकांचे प्रश्न जलद सोडवण्यावर भर-आमदार सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांना छोट्या-छोट्या कामांसाठी तालुक्याच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत,महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न गावपातळीवरच मार्गी लागावेत या उद्देशाने राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानाचा शुभारंभ आष्टी तालुक्यातील आष्टा (ह.ना.) महसूल मंडळात आमदार सुरेश धस यांच्या हस्ते शनिवार (दि.७) रोजी करण्यात आला.

यावेळी बोलताना आ. धस म्हणाले की,या अभियानाच्या माध्यमातून शेतकरी व नागरिकांचे महसूल विभागाशी संबंधित प्रश्न मंडळ व तलाठी स्तरावर जलदगतीने सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. डिजिटल सेवांच्या माध्यमातून ७/१२, ८-अ उतारे, तसेच उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रे शक्यतो एकाच दिवशी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न प्रशासनाने करावा. राज्य सरकार शेतकरी, शेतमजूर व गोरगरीबांच्या हिताचे निर्णय सातत्याने घेत असून या अभियानामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.या



### छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानाचा आष्टा येथे शुभारंभ

अभियानांतर्गत भोगवटदार वर्ग दोन जमिनींचे वर्ग एकमध्ये रूपांतर, प्रलंबित फेरफार प्रकरणे, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील अर्ज निकाली काढणे, आधार अपडेट, जन्म प्रमाणपत्र देणे, गरोदर मातांसाठी किट वाटप तसेच दिव्यांग प्रमाणपत्र अशा विविध सेवा नागरिकांना स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच शेतरस्ते व पानंद रस्त्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारी तातडीने निकाली काढाव्यात, अशा सूचनाही आ. धस यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी घोडे, उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसिलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार पांडूरंग माढेकर, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, बाल विकास प्रकल्प अधिकारी बेलेकर, अमरराजे निंबाळकर, मंडळाधिकारी राजकुमार आचार्य यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

यावेळी तहसिलदार वैशाली पाटील यांनी उपस्थित नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियानाची सविस्तर माहिती देत नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## डॉ.शिवानी बोडखे यांची कडा प्रा.आ. केंद्रात वैद्यकीय अधिकारीपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला आता एका उच्चशिक्षित आणि संवेदनशील डॉक्टरची साथ मिळाली आहे. माहेरून निर्भीड पत्रकारितेचा, तर सासरहून ज्ञानदानाचा समृद्ध वारसा लाभलेल्या डॉ.शिवानी बबिता उत्तम बोडखे यांची कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी ( ) म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे.त्यांच्या या निवडीमुळे कडा शहरात आनंदाचे वातावरण असून सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.डॉ. शिवानी यांना समाजसेवा आणि शिक्षणाचे बाळकडू घरातूनच मिळाले आहे. आष्टी तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार तसेच दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांच्या त्या सुकन्या आहेत. तर, कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांच्या त्या स्नुषा (सून) आहेत. एका बाजूला लेखणीतून लोकजागृती करणारे माहेर, तर दुसऱ्या बाजूला शिक्षणातून पिढ्या घडवणारे सासर, अशा या दुहेरी परंपरेला आता डॉ. शिवानी यांच्या रूपाने वैद्यकीय सेवेचे कोंदण लाभले आहे. जनसेवेचे हे व्रत त्या अत्यंत निष्ठेने पुढे नेतील,असा विश्वास व्यक्त होत आहे.



अत्यंत प्रेरणादायी शैक्षणिक वाटचाल

डॉ.शिवानी यांची शैक्षणिक कारकीर्द पहिल्यापासूनच अत्यंत तेजस्वी राहिली आहे.त्यांचे प्राथमिक शिक्षण आष्टी येथील जि. प. प्रा.शाळा मुर्शदपूर येथे, तर माध्यमिक शिक्षण आष्टीतील पंडित नेहरू विद्यालय आणि लातूरच्या देशी केंद्र विद्यालयात झाले. लातूर येथे दहावीच्या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यानंतर लातूरच्याच प्रतिष्ठित राजर्षी शाहू महाविद्यालयातून अकरावी आणि बारावीचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी चिपळूण (रत्नागिरी) येथील बी.के.एल. वालावलकर मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी () प्रवेश मिळवला.विशेष अभिमानाची बाब म्हणजे, एमबीबीएसच्या सर्वच वर्षांच्या परीक्षांमध्ये त्यांनी कॉलेजमध्ये टॉपर राहण्याचा बहुमान मिळवला आहे. नुकतीच त्यांची आंतरवासिता पूर्ण झाली असून त्यांनी यशस्वीरित्या पदवी प्राप्त केली आहे. रुग्णसेवेचा ध्यास आणि भविष्यातील व कडा आणि परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळवून देण्याच्या दृष्टीने त्यांची ही नियुक्ती अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे.त्यांच्या उच्च शिक्षणाचा, वैद्यकीय कौशल्याचा आणि संवेदनशील दृष्टिकोनाचा थेट फायदा परिसरातील सामान्य आणि गरीब रुग्णांना नक्कीच मिळेल. भविष्यात वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी () घेऊन रुग्णांची अखंड सेवा करण्याचा आपला मानस असल्याचे डॉ. शिवानी बोडखे यांनी आवर्जून सांगितले. डॉ.शिवानी बोडखे यांच्या या अभिमानास्पद यशाबद्दल परिसरातील सर्वच राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, वैद्यकीय व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून बोडखे आणि विधाते कुटुंबाचे अभिनंदन केले जात आहे.त्यांच्या भावी वैद्यकीय वाटचालीस सर्वांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्र.१ ची आ.सोळंके यांच्या उपस्थितीत सुरुवात

माजलगाव । प्रतिनिधी

प्रत्येक नागरिकाला दैनंदिन जीवनात विविध प्रशासकीय विभागांमध्ये कामे पडत असतात.ही कामे अधिक सुकर व जलदगतीने पूर्ण व्हावीत या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज स्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्र. १'' ची सुरुवात दि ०७ मार्च शनिवार रोजी नित्रुड येथे आ.प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

या शिबिराच्या माध्यमातून शासन थेट नागरिकांच्या दारी येत असून कमी वेळात विविध कामांचा निपटारा करून गरजू नागरिकांचे समाधान करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विविध विभागांतील प्रलंबित अर्जांचे निराकरण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.त्या अनुषंगाने प्रातिनिधिक स्वरूपात संजय गांधी निराधार मंजुरी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र,



रहिवासी प्रमाणपत्र,ॲग्री स्टॅक कार्ड, ई-शिधापत्रिका, मतदान ओळखपत्र, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे प्रमाणपत्र, भूमिहीन प्रमाणपत्र, सातबारा दुरुस्ती, आयुष्यमान कार्ड तसेच वारस नोंद प्रमाणपत्र यांचे वितरण करण्यात आले.तसेच भोगवटदार वर्ग २ जमीन भोगवटदार वर्ग १ करणे, विवादग्रस्त प्रकरणे निकाली काढून आदेश पारित करणे,अनावश्यक नोंदी अभिलेखातून कमी करणे, रस्त्यांच्या नोंदी अभिलेखात घेऊन ७/१२ वितरित करणे,एसटी महामंडळातर्फे स्मार्ट कार्ड वाटप करणे,पी.एम. किसान योजनेबाबत मार्गदर्शन व दुरुस्ती अशा विविध कामांचा निपटारा या शिबिराच्या माध्यमातून केला जाणार आहे.अर्ज स्वीकारल्यानंतर साधारणपणे आठवडाभरात कामांचा निपटारा करण्याचे नियोजन असल्याने सर्व लाभार्थ्यांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनी केले.यावेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार संतोष रुईकर यांची उपस्थिती होती.

## शिवणकाम करणाऱ्या अश्विनीताईची मुलगी निकिता घुगे एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण

वडवणी । प्रतिनिधी

इयत्ता आठवीतील राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस-२०२५ च्या परीक्षेचा निकाल नुकताच अधिकृत संकेतस्थळावर दि.२४ फेब्रुवारी २०२६ मंगळवारी रोजी जाहीर करण्यात आला यामध्ये वडवणी शहरांमध्ये शिवणकाम करणाऱ्या सौ.अश्विनी सूर्यकांत घुगे व श्री.सूर्यकांत घुगे ड्रावर व मोलमजुरी करणाऱ्या दांपत्यांची मुलगी कुमारी निकिता सूर्यकांत घुगे हिने एनएमएमएस परीक्षेत १०२ गुण घेऊन उत्तीर्ण झालेली आहे महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,वडवणी जिल्हा बीड येथील शाळेची व वडवणी शहरातील खांडवे कोचिंग क्लासेसची विद्यार्थिनी तिने जिद्द,मेहनत,चिकाटीने अभ्यास करून आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचा चीज करून हे घवघवीत यश संपादन केल आहे.आई-वडिलांच,स्वतःच,शाळेचे आणि क्लासेसचे नाव तिने रोशन केले आहे.

आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून भविष्यात खूप मोठं व्हायचे तिचे स्वप्न आहे. व आपल्या आई वडिलांचे नाव मोठे करण्याचे पण तिचे स्वप्न आहे.

या यशाबद्दल शिवसेनेचे वडवणी




तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे,अड.विठ्ठल बादाडे पाटील,सरपंच संजय धपाटे,माजी नगरसेवक दत्तात्रय जमाले पाटील, माणिक आश्रुबा भांगे (आजोबा) , श्री राधाकिसन सुरवसे व क्लासेसचे संचालक सौरभ खांडवे सर यांनी शाल,हार,बुके देऊन कु.निकिता घुगे व तिच्या आई चा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेत अर्थसंकल्पात शेतमजुरांचा समावेश, मुंडे- फडणवीसांचे आभार-ॲड.सुधीर घुमरे

पाटोदा । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या माध्यमातुन तसेच राज्य सरकारच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जनतेच्या कल्याणासाठी विविध लोक कल्याणकारी योजना राबविल्या जातात यामध्ये अनेक घटकांचा समावेश केला जातो त्यासाठी भरीव निधीची तरतूद देखील होते परंतु जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी बळीराजासाठी मात्र यावेळीच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना काम करताना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते शेतकऱ्यांना शेतात काम करताना शेती व्यवसाय करताना अनेक प्रकारची संकटे येतात शेतीमध्ये प्राणी असतात पावसाळ्यामध्ये विजेची भीती असते कारण शेतकरी रात्री अपरात्री काम करतो त्यातून त्याला गंभीर स्वरूपाची इजा होण्याची शक्यता असते या सर्व गोष्टीचा विचार गांभीर्याने करून महाराष्ट्रातील भाजपा महायुती सरकारने या अर्थसंकल्पात गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत शेत मजुराचा समावेश करण्याचा धाडसी निर्णय घेतला अशा प्रकारची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी अर्थसंकल्पात केली. व त्यासाठी भरीव तरतूद देखील केली व त्यामध्ये असे स्पष्ट निर्देश दिले व शासन निर्णय करण्यात आला की शेती व्यवसाय करताना होणाऱ्या अनेक अपघातामुळे शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास किंवा त्यास अपंगत्व आल्यास गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत त्या शेतकऱ्याच्या समावेश करून त्यास विमा छत्र प्रदान करण्याचा निर्णय करण्यात आला आहे या योजनेत शेतकरी कुटुंबातील कोणताही एक व्यक्ती सदस्य आई-वडील अविवाहित मुलगी ते ७५ वयोगटातील एकुण २ व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकतात द्या ऐतिहासिक निर्णयामुळे शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळणार आहे हा धाडसी निर्णय घेतल्याबद्दल शेतकऱ्याच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित दादा पवार महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले जात असून शेतकरी वर्गात या निर्णयाचे अतिशय उत्साहात स्वागत होत आहे असे पत्रक भाजपचे माजी तालुका अध्यक्ष अँड सुधीर घुमरे यांनी काढले आहे.

पान ६ वरुन...

### विशेष पोलीस महानिरीक्षक

त्यानंतर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची गुन्हे आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी गेवराई पोलीस स्टेशनने मोटार सायकल चोरी प्रकरणात केलेल्या उल्लेखनीय कामगीरीबाबत पोलीस निरीक्षक किशोर पवार व अधीकारी , अंमलदारांचा प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बंटेवाड व अधीकारी , अंमलदार यांचा चांगल्या कामगीरीबद्दल प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला. तसेच गेवराई पोलीस स्टेशनने मोटार सायकल चोरीचे उघड केलेल्या रॅकेटबाबत केलेल्या तपासाच्या कामगीरीचे द्वारे सादरीकरण करण्यात करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधीकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. सर्व पोलीस स्टेशन तसेच उपविभागीय पोलीस अधीकारी यांच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे. त्याचेप्रमाणे गुन्ह्यांच्या तपासातील वृट्या, बारकावे तसेच न्यायनिर्णयांचे वाचन करण्यासाठी तसेच गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धी वाढविण्यासाठी ( ) चा वापर करावा अशा सुचना विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी सुचना सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधीकारी यांना दिल्या. सन २०२५ पूर्वी बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परीस्थीतीला बीडचे पोलीस अधीक्षक नवनित काँवत यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांना सोबत घेवुन जिल्ह्यातील तणाव कमी करुन परीस्थीती नियंत्रणात आणण्यासाठी तसेच पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यातील नागरीकांसाठी सुरु केलेला ''प्रकल्प संवाद, प्रकल्प सुगम संपर्क, नागरीकांना भेटीसाठी ठरवुन दिलेल्या वेळेबाबत, समाधान ४८, पोलीस आपल्या बांधावर, तक्रार निवारण दिन तसेच विविध समाजोपयोगी राबवीलेले उपक्रम तसेच बीड पोलीस दलाने केलेल्या उत्कृष्ट कामगरीची पुस्तीका -''परिवर्तन'' चे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांचे हस्ते अनावरण करण्यात आले आहे.''परिवर्तन'' या पुस्तीकेचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी कौतुक केले असुन सन २०२५ या वर्षात बीड पोलीस दलाने केलेल्या कामगीरीबाबत समाधान व्यक्त केले आहे.

पान ६ वरुन...

### येडेश्वरी साखर कारखान्याचा

२०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत कारखान्याकडे ऊस पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच नापिकी, रस्त्याची अडचण किंवा इतर कारणांमुळे ऊस तोड होऊ शकली नसेल, अशा शेतकऱ्यांनी स्वतः ऊस तोड व वाहतूक करून कारखान्याकडे पाठवावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, कारखाना बंद होण्यापूर्वी ऊस गाळपासाठी न पाठविल्यास शिल्लक राहिलेल्या उसाबाबत कारखाना प्रशासन जबाबदार राहणार नाही तसेच त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित सर्व ऊस उत्पादकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन कारखान्याच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

### बीसीए, एमबीए सीईटी नोंदणीला

कक्षाच्या ://.. या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावर संपर्क साधून विविध संबंधित अभ्यासक्रमाच्या सीईटी प्रवेश नोंदणीस मुदतवाढ दिलेल्या तारखेच्या आत आपली नोंदणी करण्यात यावी असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

### राष्ट्रीय जलजीवन मिशनमधील

''बोगस कामांची चौकशी करा, संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करा'' अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. तसेच या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. काही काळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारण्यात आले असून प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. दरम्यान, राष्ट्रीय जलजीवन मिशन अंतर्गत होत असलेल्या कामांबाबत नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त केली जात असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी तालुक्यातील विविध गावांमधून होत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.यावेळी आंदोलनात रमेश साळवे,हेमंत गोरे,संदिपान जाधव,ग्यानबा मस्के,सिरसट उपस्थित होते.

### पाटोद्यात बसथांब्यावर

अनेक वेळा विद्यार्थ्यांना अस्वस्थता जाणवते, अशी माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे.याचप्रमाणे पावसाळ्याच्या दिवसांमध्ये देखील परिस्थिती अधिक बिकट होते. बसची प्रतीक्षा करताना प्रवाशांना पावसात भिजत उभे राहावे लागते. त्यामुळे महिला व विद्यार्थिनींना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागतो. शहरातील प्रमुख चौक असलेल्या या ठिकाणी प्रवाशांसाठी साधे निवाराशेडही उपलब्ध नसणे ही अत्यंत खेदजनक बाब असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.स्थानिक नागरिक व प्रवाशांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाचे लक्ष या समस्येकडे वेधले असल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप या ठिकाणी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाने पारगाव रोडवरील आण्णाभाऊ साठे चौक येथे तातडीने निवाराशेड उभारून बसथांब्याची व्यवस्था करावी,अशी मागणी नागरिक, विद्यार्थी व प्रवाशांकडून जोर धरू लागली आहे.

### गटनेते खुर्शीद आलम

लगाम कसुन गुंठेवारी चालु ठेवा, आठवडी बाजारचे टेंडर ओपन करावे, दर पंधरा दिवसाला जनता दरबार ठेवावे, अशोकनगर ते मक्का चौकापर्यंत चा रस्ता करा, प्रभाग क्रमांक २२,२३,२४ मध्ये मंजूर असलेल्या कामे त्वरित सुरू करावे, अकरा वर्षांपूर्वीच नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत बार्शी नाका चौकाला मिसाईल मॅन व माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.कलाम यांचे नाव देण्यात आलेले असतानाही बार्शीनाका चौकाला हायवे वाल्यांनी तोडून टाकले त्यांचावर कायदेशीर कारवाई करा असे विविध मागण्या राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदपवार चे गटनेते खुर्शीद आलम यांनी आपल्या सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने ठेवले आहेत, शेवटी आमची मागणी मान्य करून न.प.चे वसुली विभाग तळमजल्यावर आणले म्हणून खुर्शीद आलम यांनी अध्यक्ष मॅडम, मुख्याधिकारी साहेब आणि उपनगराध्यक्ष साहेबांचे विशेष आभार व्यक्त केले आहे.

### दोन लाखांच्या कर्जमाफीवर

मानसिक तणावाखाली जात असून त्यातून आत्महत्येसारखे टोकाचे प्रकार घडतात, असेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन सरकारने लाख-दोन लाख रुपयांच्या मर्यादित कर्जमाफीऐवजी सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणीही भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे. पुढे बोलताना हे ही म्हनाले

शेतकऱ्यांसाठी एआय तंत्रज्ञानाची गरज

आजच्या बदलत्या हवामानाच्या काळात शेतकऱ्यांना एआय ( ) तंत्रज्ञानाचा आधार मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

हवामान खात्याने तहसील मंडळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अचूक आणि वेळीच हवामान माहिती उपलब्ध करून द्यावी

जसे की: कोणत्या काळात जास्त पाऊस पडणार, कधी उष्णतेचा तीव्र कालावधी असेल, कधी थंडी वाढेल किंवा दुष्काळाची शक्यता असेल. अशा एआय आधारित हवामान विश्लेषण प्रणालींमुळे शेतकरी आपल्या पीक लागवडीचे नियोजन, खत व्यवस्थापन, आणि पशुधनाचे संरक्षण यामध्ये योग्य निर्णय घेऊ शकतील.

# आता शेतमजूरांचाही अपघात झाल्यास दोन लाखांपर्यंत अनुदान

पुणे : गोपीनाथ मुंडे शेतकरीअपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान ही महत्वाची योजना असून, शेती करताना अपघात झाल्यास शेतकऱ्याला किंवा त्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत दिली जाते. आता या योजनेत शेतमजूरांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्वासाठी २ लाख रुपये आणि आंशिक अपंगत्वासाठी १ लाख रुपयांपर्यंत मदत दिली जाते. ही योजना १० ते ७५ वयोगटातील पात्र शेतकऱ्यांना विना-प्रिमियम कवच प्रदान करते. पात्रता : राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य (आई-वडील, पती/पत्नी, मुलगा आणि अविवाहित मुलगी) यापैकी कोणतीही एक व्यक्ती.

वयोगट : १० ते ७५ वर्षे. अपघाती मृत्यू : २ लाख. कायमस्वरूपी अपंगत्व : २ लाख. आंशिक अपंगत्व : १ लाख. अंमलबजावणी : ही योजना आता सानुग्रह अनुदान तत्त्वावर (विमा कंपनीऐवजी थेट खात्यात) राबवली जाते, ज्यामुळे प्रक्रिया वेगवान झाली आहे. पात्र अपघातांचे प्रकार : रस्ता/रेल्वे अपघात, पिकांवर औषध फवारताना विषबाधा, वीज पडून, सर्पदंश, विंचू दंश, उंचावरून पडून, पाण्यात बुडून, जनावरांचा हल्ला, खून, दंगल इत्यादी अपवर्जित बाबी (योजना लागू न होणे) : नैसर्गिक मृत्यू, आत्महत्या, गुन्हेगारी कृत्य करताना, मद्यधुंद अवस्थेत, प्रदीर्घ आजार, युद्ध, सैन्यातील नोकरी, भ्रमिष्टपणा, स्वतःहून इजा करून घेणे. अर्ज कोठे करावा : अर्ज ग्रामपंचायत स्तरावर किंवा ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून सादर करता येतात, ज्यानंतर तो कृषी विभागामार्फत मंजूर केला जातो.



## उन्हाळ्यात जनावरे गाभण न राहण्याची कारणे आणि उपाय!



वातावरणातील बदलाचा जनावरांचे आरोग्य, त्यांची कार्यक्षमता, दूध उत्पादन यावर परिणाम होतो, परंतु सर्वात जास्त परिणाम हा जनावरांच्या प्रजनन क्षमतेवर होतो. उन्हाळ्यात जनावरे गाभण राहण्याचे प्रमाण फार कमी असते. जाणून घेऊ या मागची कारणे आणि त्यावर करता येणारे उपाय.

जनावरे गाभण न राहण्याची कारणे : उन्हाळ्यात उष्णतेमुळे जनावरे कमी चारा खातात आणि जास्त पाणी पितात. त्यामुळे रवंथ क्रिया कमी होऊन अपचन होते आणि त्यांच्या शरीरात आम्लाचे प्रमाण वाढते. त्यामुळे जनावरे गाभण राहण्याचे प्रमाण कमी होते. योग्य व संतुलित आहार न मिळाल्याने खनिजे व जीवनसत्त्वांच्या तसेच काही विशिष्ट संप्रेरकाच्या कमतरतेमुळे जनावरांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो. जनावरांच्या गर्भाशयाचे मुख माजाच्या काळात व विल्यानंतर उघडे असते. या काळात जनावरांचा गोठा घाण असेल तर जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो. हा जंतूसंसर्ग घाणीतून योनीमार्गाने गर्भाशयात जाऊन गर्भाशयाचा दाह होतो यामुळे सुद्धा जनावरे गाभण राहण्यास अडथळा निर्माण होतो. उन्हाळ्यात उपलब्ध होणारा चारा कमी पौष्टिक आणि प्रथिनयुक्त असतो. याचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होतो. प्रथिनांच्या कमतरतेमुळे जनावरांची वाढ मंदावते, उत्पादन व प्रजनन क्षमता कमी होते. जनावरांच्या घामावाटे सोडियम आणि पोटॅशियम सारखे क्षार मोठ्या प्रमाणात बाहेर पडतात. त्यामुळे क्षारांची शरीरात कमतरता निर्माण होते, यामुळे सुद्धा जनावरे गाभण राहण्यास अडथळे निर्माण होते.

उष्णतेमुळे जनावरांच्या शरिरात ताण निर्माण होतो, ज्यामुळे प्रजनन क्षमता कमी होते. तसेच, उन्हामुळे जनावरांची लैंगिक इच्छा कमी होते.

परिणाम : वरील सर्व कारणांमुळे जनावरांचे उन्हाळ्यात गाभण राहण्याचे प्रमाण कमी होते. आणि जनावरे गाभण राहिली तरी गर्भपाताचे प्रमाण वाढते. जनावरात प्रजनना संबंधित अडचणींमुळे वेतामधील अंतर वाढते, प्रजननक्षमता कमी झाल्यामुळे दुधाचे उत्पादन कमी होते.

उपाय योजना : उन्हापासून जनावरांना बचावासाठी हवेशीर निवारा उपलब्ध करून द्यावा, त्यांना सावलीत बांधावे. उन्हाळ्यात जनावरांना पौष्टिक आणि संतुलित आहार द्यावा यामध्ये हिरव्या चाऱ्यासोबतच दाणे आणि खनिज मिश्रण द्यावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाणी पुरवठा करा. योग्य वेळी कृत्रिम रेतनद्वारे जनावरांचे प्रजनन करावे. जनावरांमध्ये प्रजनन क्षमतेची समस्या असल्यास पशु वैद्याची मदत घ्या. जनावरे उलटण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी जनावरांना दररोज ५० ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे. उन्हाळ्यात म्हशींचा माज ओळखून वेळीच रेतन करावे. सकाळी जनावरांचे निरीक्षण करून माजाची लक्षणे ओळखा.

## आले शेतीतून मिळवा लाखोंचे उत्पन्न; करा या गोष्टींचा अवलंब

आले हे आरोग्यदायी जीवनासाठी महत्त्वाच्या मसाल्यां पैकी एक आहे. आल्याचा उपयोग औषध आणि सौंदर्याचा घटक म्हणून केला जातो. आल्याच्या सेवनाने हिवाळ्यातील सर्दी-खोकला कमी होण्यास मदत होते. आल्याचे तेल, पावडर इत्यादींचा वापर औषधांमध्ये देखील होतो. आल्याचे आयुर्वेदामध्ये खास महत्त्व आहे.

आले शेती नियोजन, उत्पादन आणि नफा :

शेतकऱ्यांना फायदेशीर शेती करायची असेल तर आले शेती हा त्यासाठी उत्तम पर्याय आहे. आले या पिकाच्या लागवडीत प्रचंड क्षमता आहे. आले शेतीत कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पन्न मिळवता येते. भारताचा जगात आले उत्पादनात ७ वा क्रमांक लागतो. भारतात प्रामुख्याने अरुणाचल प्रदेश, मेघालय, आसाम, ओरिसा, गुजरात आणि कर्नाटक आले उत्पादक राज्ये आहेत. भारतातील उष्ण आणि दमट हवामानाची परिस्थिती सरासरी पाऊस आणि आद्रता लक्षात घेता दक्षिण पश्चिम आणि ईशान्य भागातही आले लागवड साठी अनुकूल माती आणि वातावरण आहे. आले पिकासाठी लाल, वालुकामय, चिकन माती किंवा उत्तम निचरा असलेल्या जमिनीवर आल्याचे उत्तम पीक येते. त्यासाठी येतील जमिनीचा पीएच मूल्य ५.६ ते ६.५ असावे. आले पिकासाठी २० ते ३० अंश सेल्सियस तापमान अनुकूल असते. आले पिकाचे उत्पादन मिळण्यासाठी ८-९ महिने कालावधी लागतो.

भारतात आले लागवडीचा कालावधी ज्या त्या प्रदेशानुसार वेगवेगळ्या हंगामात लागवड केला जाते. उत्तर भारतात प्रामुख्याने १५ मे ते ३० मे तर दक्षिण भारतात मार्च - एप्रिल मध्ये पेरणी केली जाते.

लागवड पूर्व मशागत : लागवडी अगोदर शेताची चांगल्या प्रकारे मशागत करून घ्यावी. लागवडीचे शेत २ वेळा नांगरून घ्यावे. वाफे काढते वेळी लहान लहान आकाराचे वाफे तयार करावेत. सिंचनाच्या सोयी नुसार शेताचे लहान विभागात विभागणी करून लागवड करावी. भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या सुधारित आल्याच्या जाती आहेत. त्यात प्रामुख्याने मारन , रिओ दी जानेरो , वायनाड लोकल, वायनाड मानोन, थोडा, वुल्लुनातु, अर्नाडू, तुफांगिया, रिओ दि जानेरोसाठी टेली रोल इत्यादी.

लागवड पद्धत : आले जास्त लावू नये. आल्याची संख्या जास्त झाल्यास उत्पादन कमी निघते. आल्याच्या बिया जमिनीत ३ ते ४ इंच खोलवर लावाव्यात. आल्याची पेरणी ही पावसाळ्यात केली जाते त्यामुळे सिंचनाची जास्त गरज लागत नाही. पेरणीच्या वेळी शेणखत २५ ते ३० टन हेक्टरी खत गादी वाफेवर पसरावे. आले शेती कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त नफा मिळवून देते. शास्त्रोक्त पद्धतीने आले लागवड केली असता भरपूर नफा मिळतो आणि हेक्टरी सरासरी १५० ते २०० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. एका एकरात सुमारे १ लाख २० हजारांपर्यंत खर्च येतो. तर एका एकरात १२० क्विंटल उत्पादन मिळते. आल्याच्या बाजारभावानुसार ४० ते ५० रुपये एक एकरात चाळीस दाराने लागवड केल्यास सुमारे ४ लाख ८० हजार रुपयांचे उत्पादन मिळू शकते.





## दिन विशेष

### जागतिक दिवस: आंतरराष्ट्रीय महिला दिन

#### महत्वाच्या घटना

१८१७ : न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजची स्थापना
१९११ : पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला.
१९४२ : जपानने म्यानमारची राजधानी रंगून जिंकली.
१९४८ : सर्व संस्थाने भारतीय जिल्ह्यामध्ये याच दिवशी समाविष्ट करण्यात आली.
१९४८ : फलटण संस्थान भारतीय गणराज्यात विलीन झाले.
१९५७ : घाना देशाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९७४ : चार्ल्स डी गॉल विमानतळ पॅरिस, फ्रान्स मध्ये सुरु झाले.
१९७९ : फिलिप्स कंपनी ने प्रथमच सार्वजनिकरित्या कॉम्पॅक्ट डिस्क चे प्रकाशन केले.
१९९३ : दमानिया एअरवेज या खाजगी विमानवाहतुक कंपनीने आपल्या पहिल्या विमानाला 'स्पिरीट ऑफ जे. आर. डी.' असे नाव देण्याचे ठरविले.
१९९८ : भारतीय क्रिकेट राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष रमाकांत देसाई यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
२००९ : भारतीय गोल्फ खेळाडू यांनी थायलंड ओपन खिताब स्वतःच्या नावावर केला.
२०१६ : पूर्ण घडलेले सूर्यग्रहण इंडोनेशिया आणि उत्तर पॅसिफिक मधून दिसले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : हरी नारायण आपटे मराठीतील जेष्ठ कादंबरीकार (मृत्यू: ३ मार्च १९१९)
१८७९ : ऑटो हान नोबेल पारितोषिकविजेते जर्मन शात्रज्ञ (मृत्यू: २८ जुलै १९६८)
१८८६ : जीवरसायन शास्त्रज्ञ एडवर्ड कालव्हिन केन्डॉल यांचा जन्म.
१८८९ : ओडीसा चे माजी मुख्यमंत्री विश्वनाथ दास यांचा जन्म.
१९२१ : अब्दूल हयी ऊर्फ 'साहिर लुधियानवी' शायर व गीतकार (मृत्यू: २५ आक्टोबर १९८०)
१९२८ : कथालेखक वसंत अनंत कुंभोजकर यांचा जन्म.
१९३० : चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ 'आरती प्रभू' साहित्यिक (मृत्यू: २६ एप्रिल १९७६)
१९३१ : मनोहारी सिंग पट्टीचे सॅक्सोफोन वादक (मृत्यू: १३ जुलै २०१०)
१९५३ : राजस्थान च्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे सिंधिया यांचा जन्म.
१९५४ : गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांचा जन्म.
१९६३ : गुरशरणसिंघ, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९६९ : मराठी चित्रपट अभिनेता उपेंद्र लिमये यांचा जन्म.
१९७४ : फरदीन खान हिन्दी चित्रपट कलाकार
१९८९ : भारतीय महिला क्रिकेटर हर्मंप्रीत कौर यांचा जन्म

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३५ : मेवाड ची राणी कर्णावती यांचे निधन.
१७०२ : विल्यम (तिसरा) इंग्लंडचा राजा (जन्म: १४ नोव्हेंबर १६५०)
१९४२ : जोस रॉल कॅपाब्लांका क्यूबाचा बुद्धीबळपटू (जन्म: १९ नोव्हेंबर १८८८)
१९५७ : बाळ गंगाधर तथा 'बाळासाहेब' खेर स्वतंत्र भारतातील मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे ब्रिटनमधील उच्चायुक्त (जन्म: २४ ऑगस्ट १८८८)
१९७२ : भारतीय चित्रपट अभिनेता तरुण बोस यांचे निधन.
१९८८ : अमरसिंग चमकिला, पंजाबी गायक.
२००९ : लोकसभेचे माजी सदस्य गिरधारीलाल भार्गव यांचे निधन.
२०१५ : प्रसिद्ध पत्रकार तसेच आउटलुक चे संपादक विनोद मेहता यांचे निधन.

## कडधान्य प्रक्रिया युनिटसाठी सरकारकडून अनुदान

पुणे : देशाला कडधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनवून आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' जाहीर केले आहे. अभियानांतर्गत कडधान्य प्रक्रिया युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख प्रति युनिट इतके अनुदान दिले जाणार आहे. इच्छुक वैयक्तिक अर्जदार, संस्था, महासंघ व शेतकरी बांधवांनी काढणीपश्चात प्रक्रिया युनिट घटकाचा लाभ घेण्यासाठी ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

सन २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानाची अंमलबजावणी राज्यात रब्बी हंगाम २०२५-२६ पासून सुरू झाली आहे.अभियानांतर्गत तूर, उडीद व मसूर या प्रमुख कडधान्य पिकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार असून उत्पादनवाढीसोबतच मूल्यवर्धनावर भर देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने काढणीपश्चात पायाभूत सुविधा बळकट करण्यावरही विशेष भर देण्यात येत आहे. सन २०२६-२७ या वर्षात काढणीपश्चात प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या घटकासाठी वैयक्तिक अर्जदार, शेतकरी उत्पादक संस्था , क्लस्टर स्तर महासंघ , प्राथमिक कृषी पतसंस्था तसेच महाराष्ट्रातील विविध कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत उपक्रम व संस्था पात्र राहतील. इच्छुक अर्जदारांनी काढणीपश्चात प्रक्रिया युनिट घटकाचा लाभ घेण्यासाठी ऑफलाइन पद्धतीने तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही म्हटले आहे. योजनेअंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के, कमाल २५ लाख प्रति युनिट इतके अनुदान देय राहणार आहे. त्यामुळे कडधान्य प्रक्रिया, स्वच्छता, ग्रेडिंग, पॅकेजिंग आदी सुविधा उभारून स्थानिक स्तरावर मूल्यवर्धनाला चालना मिळणार आहे.

## मिरची रोपांची फसवणूक टाळण्यासाठी अशी घ्या काळजी

मिरची हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पीक आहे, विशेषतः मराठवाडा, नागपूर आणि सोलापूर परिसरात याची लागवड मोठ्या प्रमाणात होते. मात्र, मागील काही वर्षांपासून मिरचीच्या रोपांबाबत फसवणूक, चुकीच्या जाती आणि कमी दर्जाची रोपे यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. दर्जेदार आणि रोगमुक्त रोपांची निवड ही यशस्वी लागवडीसाठी पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे. या लेखात मिरची रोपे निवडताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन दिले आहे, जेणेकरून शेतकरी फसवणुकीपासून वाचतील आणि सुदृढ पीक घेता येईल.

विश्वासार्ह नर्सरीची निवड : मिरची रोपे खरेदी करताना नेहमी नावाजलेल्या आणि विश्वासार्ह नर्सरीला प्राधान्य द्यावे. मराठवाड्यातील भोकरदन, जालना, सिल्लोड, फुलंब्री, अजंठा किंवा नागपूर, सोलापूर परिसरातील शेतकरी स्थानिक पातळीवर चांगल्या नर्सरींची माहिती घेऊ शकतात. अनुभवी शेतकरी, कृषी तज्ज्ञ किंवा स्थानिक कृषी केंद्र यांचा सल्ला घ्यावा. नर्सरीने रोपांच्या जातीबाबत स्पष्ट माहिती, प्रमाणपत्र आणि रोगमुक्तीची हमी द्यावी. जर नर्सरी संशयास्पद वाटत असेल किंवा माहिती अपुरी असेल, तर तिथून रोपे खरेदी करणे टाळावे. नर्सरीत स्वच्छता राखली गेली आहे का, रोपे योग्य अंतरावर लावलेली आहेत का, आणि पाण्याचा निचरा व्यवस्थित होतो का, याची



पडताळणी करावी. अस्वच्छ नर्सरीतून रोगग्रस्त रोपे मिळण्याची शक्यता जास्त असते.

रोपांची बाह्य तपासणी : पाने - रोपांची पाने हिरवी, टवटवीत, चकचकीत आणि रोगमुक्त असावीत. पानांवर पिवळेपणा, कुरकुरणे, मोजॅक पॅटर्न (पानांवर ठिपके किंवा विचित्र रचना), पांढरे किंवा राखाडी डाग किंवा पांढऱ्या माशीची लक्षणे दिसल्यास ती रोपे नाकारावी. पानांच्या खालच्या बाजूस लहान पांढरे कीटक (पांढरी माशी) दिसल्यास ती रोपे व्हायरसग्रस्त असण्याची शक्यता आहे.

खोड - रोपांचे खोड मजबूत, सरळ आणि हिरवे असावे. खोड पातळ, कमकुवत, तपकिरी किंवा काळवंडलेले असल्यास ती रोपे कमी दर्जाची असू शकतात. खोडावर कोणतेही डाग किंवा जखमा नसाव्यात.

मुळे - मुळे पांढरी, निरोगी आणि चांगली वाढलेली असावी. मुळे पिवळ्या, कुजलेल्या, काळ्या किंवा कमकुवत असल्यास ती रोपे निवडू नयेत. मुळांची लांबी आणि घनता तपासावी; निरोगी मुळे दाट आणि मजबूत असतात. रोपांचा एकूण आकार एकसमान असावा. खूप लहान किंवा खूप मोठी रोपे टाळावी, कारण त्यांचा जमिनीत स्थिर होण्याचा दर कमी असतो.

जातीची खात्री - रोपे खरेदी करताना नर्सरीकडून जातीचे नाव, वैशिष्ट्ये आणि उत्पादनक्षमता याबाबत लेखी माहिती घ्यावी. उदा., मराठवाड्यात 'एडवांटा गोल्डन -४७', 'नन्हेम्स आर्मर', 'राशी सोनल' किंवा 'पुसा ज्वाला' या जाती लोकप्रिय आहेत, तर नागपूरात 'सिमीन्स सितारा गोल्ड' आणि सोलापूरात 'टीम सीड शक्ती' यांना मागणी आहे. चुकीच्या जातीची रोपे मिळू नयेत म्हणून शक्यतो स्थानिक बाजरपेठेची मागणी आणि हवामानानुसार योग्य जाती निवडावी. नर्सरीने जातीबाबत अस्पष्ट माहिती दिल्यास किंवा प्रमाणपत्र नसल्यास तिथून रोपे घेणे टाळावे. स्थानिक कृषी केंद्र, कृषी विद्यापीठ किंवा अनुभवी शेतकऱ्यांचा सल्ला घेऊन जातीची खात्री करावी.

रोपांचे वय आणि आकार : लागवडीसाठी २५-३० दिवसांची रोपे आदर्श मानली जातात. या वयात रोपे साधारण ६-८ इंच उंच, ४-६ पानांसह आणि मजबूत खोडासह असावीत. खूप लहान (१५-२० दिवसांची) रोपे कमकुवत असतात, तर खूप मोठी (४०-५० दिवसांची) रोपे जमिनीत स्थिर होण्यास वेळ लागतो. योग्य वयाची रोपे निवडावी. नर्सरीत रोपे जास्त काळ ठेवलेली नसावी, कारण अशी रोपे कमकुवत होऊ शकतात. नर्सरीकडून रोपांचे वय आणि तयारीची तारीख विचारावी.

# महिलांनी स्वतःच्या क्षमतेची जाणीव ठेवून ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करावेत-जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

महिलांनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून जीवनात मोठी ध्येये निश्चित करावीत आणि ती साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत तसेच आजच्या बदलत्या जागतिक परिप्रेक्ष्यात महिलांसाठी शिक्षण, उद्योग, तंत्रज्ञान आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत असून विद्यार्थिनींनी या संधींचा योग्य प्रकारे उपयोग करून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व भारतीय खेल प्रधिकरण यांचे सयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त दि. ०६ मार्च २०२६ रोजी क्रीडा संकुल, जालना येथे आयोजित कार्यक्रमा दरम्यान त्या बोलत होत्या. सामान्य रुग्णालय नर्सिंगचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी, जिल्हा परिषद कर्मचारी, समाज कल्याण हॉस्टेल कर्मचारी, संकुलावर



प्रशिक्षणासाठी नियमित येणारे महिला आणि खेळाडू यांच्यासाठी समुपदेश मार्गदर्शन,महिलांचे आरोग्य बाबत, समुपदेश मार्गदर्शन , कायदेशीर अधिकार व सक्षमीकरण व मनोरंजनात्मक खेळ / रस्सीखेच / लगोरी / बास्केटमध्ये बॉल टाकणे /संगीतखुर्ची/ या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पारंपरिक क्षेत्रांपुरते करिअर मर्यादित राहिलेले नाही. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल क्षेत्र, संशोधन, स्टार्टअप्स तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विविध क्षेत्रांमध्ये महिलांसाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने या क्षेत्रांकडे वळून आपल्या क्षमतांचा विकास करावा.त्या पुढे म्हणाल्या की, कृत्रिम बुद्धिमत्ता ( ), डेटा सायन्स, रोबोटिक्स, सायबर सुरक्षा, डिजिटल मार्केटिंग यांसारख्या आधुनिक विषयांमध्येही मोठ्या प्रमाणात करिअरच्या संधी उपलब्ध होत आहेत. या क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचीही संधी उपलब्ध होत आहे.विद्यार्थिनींनी आपल्या आवडी-निवडी ओळखून योग्य दिशेने शिक्षण घ्यावे, कौशल्य विकासावर भर द्यावा आणि बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. शिक्षणासोबतच आत्मविश्वास, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन या गुणांच्या बळावर महिलांना कोणतेही ध्येय गाठणे शक्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. महिलांनी आपल्या आरोग्याबाबत विशेष जागरूक राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी महिलांना संतुलित आहाराचे महत्त्व पटवून देत विविध आजार व त्यावर उपयुक्त आहाराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच डॉ. शेख तरन्नुम, प्राचार्य, मत्स्योदरी लॉ कॉलेज, जालना यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी कायद्याचे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. महिलांनी आपल्या हक्कांविषयी माहिती घेतल्यास त्यांना समाजात अधिक सक्षमपणे उभे राहता येईल, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी लागू असलेल्या विविध कायद्यांबाबतही माहिती दिली.

# कारमधून जाणारा गुटखा मंठा पोलिसांनी पकडला



मंठा। प्रतिनिधी

अवैधरित्या गुटखा घेऊन जाणारी कार मंठा पोलिसांनी तळणी फाटा येथे पकडली. पोलिसांनी कारसह ४९३१४/- रुपयांचा गुटखा व कार असा एकूण ३ लाख ४९ हजार ३१४ रुपयांचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी रवि जाधव यांच्या फिर्यादीवरून संशयित योगेश महादेव अवचार, आकाश अग्रवाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

वाटूर फाट्याकडून मंठ्याकडे एक इसम अवैधरीत्या गुटखा घेऊन मंठ्याकडे येत असल्याची माहिती मंठा पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी तळणी फाटा येथे सापळा लावून वाटूर फाट्याकडून मंठ्याकडे येणाऱ्या कारला थांबवले. कारची पाहणी केली असता, त्यात ४९३१४/- रुपयांचा गुटखा दिसून आला. कारचालक योगेश महादेव अवचार (२६ रा. विडोळी, ता. मंठा) याला ताब्यात घेतले. त्याने सदरील गुटखा हा आकाश अग्रवाल (रा. वाटूर, ता. परतूर) याच्याकडून आणल्याचे सांगितले. याप्रकरणी दोघांवर मंठा ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे, पोलीस कर्मचारी आनंद ढवळे, रवी जाधव व कर्मचाऱ्यांनी केली.

# भगवानगड परिसरात पाणीटंचाईच्या तीव्र झळा

## पाण्याचे टँकर सुरू करावे लागण्याची शक्यता!

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुका हा कायमच अवर्षणग्रस्त भाग असल्याने येथे कायम पावसाचे अल्प प्रमाण असल्याने आणि पाथर्डी तालुक्यासारख्या दुष्काळी पट्ट्यात कायमच पाण्याचे स्रोत नसल्याने दुष्काळाच्या तीव्र झळा सोसाव्या लागतात पुन्हा एकदा मार्च महिना सुरू होताच पाथर्डी तालुक्यातील खास करून पूर्व भागातील भगवानगड परिसरातील मालेवाडी आणि परिसरातील १२ वाड्या भालगाव पर्यंत भीषण पाणीटंचाई निर्माण झाली सप्टेंबर २०२५ मध्ये पाथर्डी तालुक्यात अतिवृष्टी झाली यात खरीप हंगामातील पिके वाहून गेली शेतकऱ्यांच्या हातातोंडतला घास निसर्गाने हिरावून घेतला रब्बी हंगामात पुन्हा दुबार पेरणी करून शेतकऱ्यांनी गहू हरभरा भुईमूग मूग कपाशी ऊस अशी नगदी पिके घेतली परंतु ऐन उन्हाच्या तीव्र झळा बसत असताना आता मात्र पाणीटंचाईचे नवीन संकट शेतकऱ्यांवर निर्माण झाले आहे यामुळे मार्च महिना सुरू होताच विहीर नदी तलाव बोरवेल अत्यंत कोरडेखट पडले असून पिण्याच्या पाण्यासह सांडपाण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे त्यामुळे तातडीने महसूल प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधी आमदार मोनिका राजळे यांनी पाथर्डी तालुक्यातील टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करून शासनाकडे पाठपुरावा करून पाणीटंचाई बाबत टँकर सुरू करण्याचा प्रस्ताव पारित करून घ्यावा अशी मागणी संजय किर्तने यांनी केली आहे.

पाथर्डी तालुका अवर्षणग्रस्त व पठारी भाग असल्याने येथे कायम अल्प पाऊस पडतो जेमतेम डिसेंबर जानेवारी पर्यंत विहीर तलाव बोरवेल या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची आणि सांडपाण्याची व्यवस्था होते परंतु फेब्रुवारी मार्च या महिन्यात बोरवेल विहीर तलाव पूर्ण आटल्याने जनावरांच्या चारा पिण्याचे पाणी याची तीव्र टंचाई भासू लागते हे वास्तव असून तातडीने यासंदर्भात टंचाई आढावा बैठककीत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

**- डॉ.उद्धव नाईक**
**(तहसीलदार पाथर्डी)**

दुष्काळमुक्त पाथर्डी तालुका करण्याचे धोरण तालुका प्रशासन प्रतिनिधींकडून दरवर्षी आखले जाते परंतु अजून पाथर्डी तालुका दुष्काळ मुक्त करता आला नाही किंवा यावर शाश्वत काम झाले नाही भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजनेला मविआ सरकारच्या काळात २०१९-२० ला मंजुरी मिळाली परंतु पैठण जलाशयातून कायमस्वरूपी भगवानगड परिसर आणि ४६ गावांना कायमस्वरूपी शाश्वत पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्याची योजना जवळपास पूर्णपणे खिळखिळी झाली आहे यासाठी २०३ कोटी रुपये निधी मंजूर झाला होता त्या योजनेचे पुढे काय झाले योजना पूर्णत्वास का झाली नाही दोन वर्षात योजना पूर्ण करण्याचे आश्वासन आमदार मोनिका राजळे यांनी दिले होते योजनेला मुर्त स्वरूप का प्राप्त झाले नाही हा खरा प्रश्न आहे.

**- संजय बडे ( अध्यक्ष भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजना )**

# मुलींसाठी स्वसंरक्षण शिबिरे घ्यावी-घनश्यामदास गोयल

जालना । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य प्रत्यक्ष साकारायचे असेल तर शिवछत्रपतींचा संपूर्ण इतिहास विद्यार्थ्यांना शिकवला जावा.शिवजन्मोत्सव समितीने मुलींसाठी आत्मरक्षण शिबिरे आयोजित करावीत यासाठी आपले सहकार्य राहील असे प्रतिपादन उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त श्री शिवछत्रपती सांस्कृतिक मंडळ जालना संचलित सर्वपक्षीय शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या खुल्या जिल्हास्तरीय पत्र लेखन स्पर्धेचे बक्षीस वितरण शनिवारी ( ता.०७)जे.ई.एस.महाविद्यालयाच्या



सभागृहात समितीचे मार्गदर्शक घनश्यामदास गोयल, अंकुशराव राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सुभाषचंद्र देवीदान, कार्याध्यक्ष रवींद्र राऊत, रोहित भुरेवाल ,सचिव शिवप्रकाश चितळकर ,कोषाध्यक्ष सतीश जाधव, हिरालाल पिपरिये, बालाजी बांडे, पवन जोशी , रघुनंदन कंगले, परीक्षक ,राजेंद्र सोनवणे अशोक काकडे, मोहन शिंदे.रामेश्वर खार्डे यांची उपस्थिती होती.

अंकुशराव राऊत यांनी जालना शहरात स्वा. सै.रामभाऊजी राऊत,कै .बाबूलाल पंडित, कै.बलीराम यादव आणि सहकाऱ्यांनी सर्वप्रथम बैलगाडीवर मिरवणूक काढून शिवजयंती साजरी केली होती. आमच्या पिढीने ही परंपरा पुढे नेली असून येणारी पिढी सुद्धा ही परंपरा जोपासते आहे असे सांगून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. रवींद्र राऊत यांनी युवा पिढी भरकटलेल्या मार्गाने जात आहे. स्पर्धेच्या माध्यमातून शिवछत्रपतींचे संस्कार रुजविण्याचा समितीचा प्रयत्न असून पुढील वर्षी मोठ्या स्वरूपात स्पर्धा घेणार असल्याचे सांगितले. समितीचे सचिव शिवप्रकाश चितळकर यांनी आभार मानले. समिती तर्फे प्रथमच घेण्यात आलेल्या स्पर्धेत १७५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे प्राथमिक गट: प्रथम मयुरेश राऊत ,द्वितीय अक्षता नाईक, तृतीय समीक्षा घोलप, माध्यमिक गट : प्रथम प्रियंका चौधरी, द्वितीय रिद्धी कंठाळे ,तृतीय जयश्री फलके, उत्तेजनार्थ :कविता नरवडे ,साक्षी रोकडे ,तृप्ती गिरी ,मनाली जोशी, साक्षी देशमुख, प्रेरणा शिंदे, भक्ती जोशी, तन्मय जोशी. विजेत्यांना प्रत्येकी २१००,११००,५०० रोख बक्षिसे, स्मृती चिन्ह, तसेच सहभागींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले . यावेळी समितीचे सदस्य,स्पर्धक, शिक्षक,पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मुंगूसवाडेचे सरपंच अण्णासाहेब खेडकर यांचे दुःखद निधन

पाथर्डी। प्रतिनिधी



मुंगूसवाडे गावचे तब्बल ३५ वर्ष माजी सरपंचपद भूषवलेले सामाजिक कार्यकर्ते अण्णासाहेब दादा खेडकर यांचे गुरुवारी अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले ते गेल्या काही दिवसांपासून खाजगी रुग्णालयात उपचार घेत होते त्यांच्या पश्चात मुलगा मुलगी सुश्णा नातवंड असा मोठा परिवार आहे अण्णासाहेब दादा खेडकर यांच्या निधनाने भालगाव पंचायत समिती गणात जुन्या पिढीतील एक मनमिळाऊ शांत संयमी राजकीय नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे अण्णासाहेब दादा खेडकर यांनी मुंगूसवाडे गावचे ३५ वर्ष सरपंच पद भूषवत गावच्या विकासात मोलाचा वाटा उचलला तसेच गावातील शिक्षण आरोग्य आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कायम शासन दरबारी आवाज उठवत राहिले अण्णासाहेब दादा खेडकर यांच्या निधनाने अनेक राजकीय लोकप्रतिनिधींनी शोक व्यक्त केला आहे.

# महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा अर्थसंकल्प -रावसाहेब दानवे

जालना। प्रतिनिधी

राज्य सरकारने सादर केलेला सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा तसेच विकसित भारतच्या ध्येयाला बळकटी देणारा असल्याची अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी व्यक्त केली. या अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, महिला, तरुण तसेच ग्रामीण आणि शहरी विकासाला प्राधान्य देण्यात आले असून राज्याच्या आर्थिक प्रगतीचा भक्कम पाया आहे, असे दानवे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान तसेच 'बळीराजा मोफत वीज योजना सुरू ठेवण्याचा निर्णय हा शेतकऱ्यांना दिलासा देणारा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मराठवाड्यासह दुष्काळग्रस्त भागासाठी कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी वळवण्याचा प्रकल्प आणि वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे भविष्यात पाणी प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी माझी लाडकी बहीण योजना आणि लखपती दीदी उपक्रमाला दिलेले बळ तसेच तरुणांसाठी स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्यात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणारा ठरेल. जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातील जिल्ह्यांचा'आकांक्षित जिल्हे कार्यक्रमात समावेश करण्यात आल्यामुळे या भागाच्या विकासाला मोठी गती मिळेल, असेही दानवे म्हणाले. ''हा अर्थसंकल्प राज्याच्या प्रगतीचा दूरदृष्टीपूर्ण आराखडा आहे. या निर्णयांमुळे महाराष्ट्र अधिक सक्षम, समृद्ध आणि विकसित होईल,'' असा विश्वास रावसाहेब पाटील दानवे यांनी व्यक्त केली.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत महाराष्ट्रातील साठाहून अधिक उमेदवार यशस्वी

**नवी दिल्ली। प्रतिनिधी**

**केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा -२०२५ मध्ये देशातील एकूण ९५८ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यात राज्यातील ६० हून अधिक उमेदवारांचा समावेश आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या वर्ष २०२५ च्या नागरी सेवा मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील पाच उमेदवारांचा समावेश आहे. ऋषीकेश आलासे ६१ ,आकाश त्रिवेदी यांनी ७३, गौरव चोपडा यांनी ८३, सायली पगार यांनी ८७, वा तर दिक्षा पाटकर यांनी ८८ वा क्रमांक पटकावला आहे.**

यशस्वी उमेदवारांची यादी हृषीकेश आलासे (६१) आकाश त्रिवेदी (७३) गौरव चोप्रा (८३) सायली पगार (८७), दीक्षा पाटकर (८८), ऋतुजा गायकवाड (१०६), वरुण टोकस (११७), अंकिता अनिल पाटील (१४०), आर्यन सिरसीकर (१७५), कार्तिक बच्छाव (१७७), राहुल पाटील (२२४), शुभम शरद बेहेरे (२२६), ऋषिकेश पालिमकर (२८३), मोहिनी जगताप (३२३), अभिषेक ओझार्डे (३३६), हर्षवर्धन पाटील (३४९), हर्षवर्धन तिडके (३५५), कुणाल अहिरराव (४३०), अभिषेक मगदूम (४४९), धनश्री अहिरे (४८९), मनोज पाटील (४९३), विशाखा कदम (५०४), नंदिनी पाटील (५१२), रजत वाळके (५१४), निखिल तांबे (५१७), श्रुती चव्हाण (५२७), धनंजय दिघे (५२९), संकेत कुंभार (५३९), साईराज पाटील (५४५), आरुषा पाटील (५५३), पारस मिस्त्री (५५५), बापूसाहेब गायकवाड (५६१), प्रवीण कोळपे (५८४), अविष्कार डेर्ले (५९१), रोहित माळवेकर (६०१), अभिषेक टेकाडे (६१०), सिद्धार्थ तागड (६१९), भाग्यश्री नायकेले (६४७), शिवम वखारे (६५१), पांडुरंग कांबळी (६६०), अश्विनी कोळेकर (६७५), प्रज्वल नासरे (६७७), अल्पेश ढवळे (६८७), सूरज सूर्यवंशी (७०२), रामेश्वर शिंदे (७०५), बसवराज पाटील (७३९), प्रीतकुमार भाले (७४२), राजश्री देशमुख (७५४), चेतन ठाकरे (७६२), प्रांजली मेश्राम (७६७), मनीष झेंडे (७८८), प्रथमेश शिंदे (८१७), राहुल चांडोलकर (८३१), हेमकृष्ण पिसाडे (८४९), अतुल राजुरकर (८६३), रोहित सांगळे (८६५), सुरेश बोरकर (९१२), प्रेरणा खवले (९१३), अनिकेत अहिरे (९४१)

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी ऑगस्ट २०२५ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. डिसेंबर २०२५- फेब्रुवारी २०२६ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण ९५८ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. यामध्ये सामान्य (ओपन) गटातून ३१७, आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) १०४, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून (ओबीसी) - ३०६, अनुसूचित जाती प्रवर्गातून (एससी) - १५८, अनुसूचित जमाती प्रवर्गातून- ७३ उमेदवारांचा समावेश आहे. लोकसेवा आयोगाने २५८ उमेदवारांची आरक्षित सूची ( ) तयार केली आहे. यामध्ये सामान्य गट- १२९, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस)- २६, इतर मागास वर्ग -८६, अनुसूचित जाती- ०८, अनुसूचित जमाती - ०६ उमेदवारांचा समावेश आहे. यासोबत एकूण तीन दिव्यांग उमेदवारांचा समावेश आहे.

या रिक्त पदांवर उमेदवार होतील रूजू : भारतीय प्रशासन सेवा (आयएएस) या सेवेत शासनाकडे एकूण -१८० जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (जनरल) ७४, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १८इतर मागास वर्ग (ओबीसी) ४७, अनुसूचित जाती (एससी) २८, अनुसूचित जमाती (एसटी) १३ जागा रिक्त आहेत. उमेदवारांच्या गुणानुक्रमे रिक्त जागांवर यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल. भारतीय विदेश सेवा (आयएफएस) या सेवेत शासनाकडे एकूण ५५ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (ओपन) २२, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) ०६, इतर मागास वर्ग (ओबीसी) १५, अनुसूचित जाती (एससी) ०८, अनुसूचित जमाती (एस.टी.) ०४ जागा रिक्त आहेत. भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) या सेवेमध्ये एकूण १५० जागा रिक्त आहेत, यामध्ये सामान्य गटातून (ओपन) ६०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १५, इतर मागास प्रवर्गातून - ४२, अनुसूचित जाती प्रवर्गातून - २२, तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून ११ उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार आहे. केंद्रीय सेवा गट अ - या सेवेमध्ये एकूण - ५०७ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - २११, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) ४८ , इतर मागास प्रवर्गातून -१४१, अनुसूचित जाती प्रवर्गातून - ७३ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून ३४ उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. केंद्रीय सेवा गट ब - या सेवेमध्ये एकूण १९५ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - ७९, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) १७ उमेदवार, इतर मागास प्रवर्गातून - ६१, अनुसूचित जाती प्रवर्गातून २७ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून -११ उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल. एकूण ३४८ उमेदवारांची निवड तात्पुरत्या स्वरुपाची असेल. अधिकृत निकाल व यशस्वी उमदेवारांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.





## औसा-तुळजापूर महामार्गावर भीषण अपघात

# भरधाव कारची ट्रक-कंटेनरला धडक, ४ जणाचा जागीच मृत्यू

औसा । प्रतिनिधी

औसा-तुळजापूर महामार्गावर शुक्रवारी रात्री १०:१५ च्या सुमारास काळजाचा थरकाप उडवणारा विचित्र अपघात झाला. एका भरधाव बीएमडब्ल्यू कारने ट्रक आणि कंटेनरला भीषण धडक दिली. या अपघातात कारचा चक्काचूर झाला असून, चौघांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर दोघे जण गंभीर जखमी आहेत.

सांगली येथील व्यापारी धनराज जाधव हे आपल्या सहकाऱ्यांसह लातूरला कामानिमित्त आले होते. शिवली येथे जेवण आटोपून सहकाऱ्याला सोडण्यासाठी ते औशाकडे जात असताना, औशानजीक एका हॉटेलसमोर हा अपघात घडला. कारने ( ०४ ७५००) पुढे चाललेल्या लाकडाने भरलेल्या ट्रकला ( २५ ०५२२) आणि एका कंटेनरला ( १२ ७६४२) पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की, ट्रक १०० फूट पुढे जाऊन उलटला, तर कार रस्त्यालगतच्या खड्ड्यात कोसळून पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. मृतांची नावे: १. धनराज काशीनाथ जाधव (४९, रा. सांगली - व्यापारी) २. आबासाहेब साळुंके (३६, रा. बोरगाव न.) ३. शुभम शेषेराव पाटील (२६, रा. बोरगाव न.) ४. किसन रामलिंग साळुंके (४९, रा. बोरगाव



न.) जखमी:या अपघातात जयहिंद विश्वास जाधव (३०, रा. औसा) आणि विनायक श्रीकांत हालदर (२८, रा. सांगली) हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सांगलीचे व्यापारी धनराज जाधव हे बोरगावच्या तरुणांच्या मदतीने जिल्ह्यात व्यवसायाचे जाळे विस्तारत होते, मात्र काळाने त्यांच्यावर झडप घातली.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

रविवार दि.०८ मार्च २०२६


# ३६० खाटांच्या रुग्णालयासाठी ३०४ कोटींची घोषणा

## पण २१ कोटींची माता-बालसंगोपन इमारत साडेतीन वर्षांपासून धुळखात

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्हा रुग्णालयाच्या ३६० खाटांच्या विस्तारीकरणासाठी ३०४ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला. मात्र प्रत्यक्षात बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात सुमारे २१ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेली माता व बालसंगोपन इमारत गेल्या साडे तीन वर्षांपासून फर्निचर, अग्निरोधक यंत्रणा, लिफ्ट आदींसाठी आवश्यक निधी न मिळाल्याने धुळखात पडून असून अद्याप कार्यान्वित करण्यात आलेली नाही, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दिली.




या इमारतीसाठी केवळ १० कोटी रुपयांच्या निधीअभावी काम रखडलेले असतानाही शासनस्तरावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. डॉ. ढवळे यांनी सहकाऱ्यांसमवेत गेल्या तीन वर्षांपासून शासन दरबारी निवेदने देत तसेच विविध आंदोलनांद्वारे तत्कालीन पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.

दरम्यान, तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी इमारतीची पाहणी करून जिल्हा नियोजनमधून ३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली होती. त्या निधीतून काही कामे पूर्ण झाली; मात्र इमारत पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी अजूनही सुमारे ७ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून अद्याप निधी मंजूर करण्यात आलेला नाही, असे डॉ. ढवळे यांनी सांगितले. यामुळे ३६० खाटांच्या रुग्णालयासाठी जाहीर करण्यात आलेल्या ३०४ कोटी रुपयांच्या निधीच्या घोषणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून "ही केवळ बोलून मोकळं होण्याची घोषणा असून बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात" असल्याची प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी व्यक्त केली.

बीड जिल्हा रुग्णालयाची सध्याची इमारत अपुरी पडत असून त्याच ठिकाणी सोनोग्राफी व एक्स-रे विभाग कार्यरत आहेत. दररोज सुमारे ४०० हून अधिक रुग्ण तपासणीसाठी येतात; मात्र व्हरांड्यात केवळ १५ ते २० रुग्णांसाठीच बसण्याची व्यवस्था असल्याने गर्भवती महिलांना ताटकळत उभे राहावे लागते. आयपीडी विभागातही गर्दी वाढल्याने उपचारात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करून माता-बालसंगोपन रुग्णालयाची इमारत कार्यान्वित करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## सालगडी बेपत्ता; कुटुंबीयांची पोलीस ठाण्यात धाव

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुट्टेवाडी येथील रहिवासी बापुराव भाऊराव नेहरकर (वय ३८) हे मागील काही दिवसांपासून बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून यामुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबीयांनी याबाबत पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बापुराव नेहरकर हे पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील सुखदेव मारुती सानप यांच्याकडे सालगडी म्हणून काम करत होते. दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी "कुट्टेवाडी येथे जाऊन येतो" असे सांगून तेथून निघाले होते. मात्र त्यानंतर ते कामावर परत आले नाहीत.

सहा दिवस उलटूनही ते परत न आल्याने सुखदेव सानप यांनी दि. ४ मार्च रोजी कुट्टेवाडी येथे जाऊन कुटुंबीयांशी संपर्क साधला. मात्र बापुराव नेहरकर हे कुट्टेवाडी येथे आलेच नसल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. त्यानंतर वडील भाऊराव देवराव नेहरकर यांनी नातेवाईक व परिचितांकडे चौकशी केली, परंतु त्यांचा काहीही मागोवा लागला नाही. शेवटी दि. ५ मार्च २०२६ रोजी कुटुंबीयांनी पाटोदा पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. पोलिसांनी हरवलेल्या व्यक्तीची नोंद क्र. ०००५/२०२६ अशी केली असून पुढील तपास पोलीस शिपाई गोरक्षनाथ मिसाळ करत आहेत. दरम्यान, बापुराव नेहरकर यांच्याबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास त्वरित पाटोदा पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## येडेश्वरी साखर कारखान्याचा गाळप हंगाम १० मार्चला होणार बंद

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील आनंदगाव सारणी येथील येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट्स लि. या साखर कारखान्याचा चालू गाळप हंगाम दि.१० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बंद करण्यात येणार असल्याची अधिकृत माहिती कारखाना प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस अद्याप गाळपासाठी बाकी आहे, त्यांनी तातडीने कारखान्याच्या शेती विभागाशी संपर्क साधून कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व सदस्य तसेच बिगर सदस्य ऊस उत्पादकांनी चालू गाळप हंगाम २०२५-२६ साठी कारखान्याकडे उसाची नोंद केली होती. नोंद झालेल्या बहुतांश उसाचे गाळप पूर्ण झाले असून उर्वरित उसाबाबत शेतकऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचा नोंद केलेला ऊस गाळपाअभावी शिल्लक राहिला असेल त्यांनी १० मार्च ◀◀ पान ३ वर

## बीसीए, एमबीए सीईटी नोंदणीला १८ मार्चपर्यंत मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या २०२६- २७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश परीक्षेसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी कक्ष ) बॅचलर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी (बीएचएमसीटी), बॅचलर ऑफ कॉम्प्युटरॲप्लिकेशन( बीसीए), बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन( बीबीए), बॅचलर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट( बीबीएम ), बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ( बीएमएस ), एमबीए, एमसीए( इंटिग्रेटेड), या अभ्यासक्रमांसाठीच्या सीईटी नोंदणीला आता १८ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत यासाठी ५६ हजार ७२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षी बी. एचएमसीटी साठी १४३६ विद्यार्थी आणि बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम, एमबीए, एमसीएसाठी १ लाख १२ हजार ९२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा ◀◀ पान ३ वर

## संपणार नाही माझ्या शिवरायांचा दरारा-प्रेरणा शिंदे

बीड । प्रतिनिधी

येथील शिंदे नगर भागातील रेणुका प्राइड वसाहती ६ मार्च रोजी तिथीनुसार शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला, यावेळी कु. प्रेरणा शिंदे या बाल शिवभक्त मुलींनी "आले किती, गेले किती, उडून गेले भरारा, संपला नाही व संपणार नाही माझ्या शिवरायांचा दरारा" अशा भावनेतून भाषण केलं, याचं उपस्थित सर्वांनी मोठं कौतुक केले .



पुढे ,छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन करताना प्रेरणा म्हणते छ म्हणजे छत्तीस हत्तीचे बळ असणारे, धर्म शत्रु ना त्रस्त करणारे, परत न फिरणारे, तीन्ही जग जगवणारे, शिस्तप्रिय वाणीत तेज, जिजाऊंचे पुत्र, महाराष्ट्राची शान, हार न मानणारे ,राज्याचे हितचिंतक, जनतेचा राजा.... असे होते आपले महाराज, हे वर्णन सांगून शिवजयंती निमित्ताने मनामना त प्रेरणेची ज्योत पेटवण्यासाठी कु.प्रेरणा शिंदेचे गव्हाणेआण्णा, आदित्य जाधव, शिवा येळवे, पत्रकार प्रमोद कुलकर्णी, डोरले, येळवेमामा आणि वडील फौजी पांडुरंग शिंदे यांनी कौतुक करून सत्कार केला.

## राष्ट्रीय जलजीवन मिशनमधील कथित बोगस कामांबाबत 'अर्धनग्न हलगी बजावो' आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात राष्ट्रीय जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा प्रभारी अड. अमोल डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समिती कार्यालयासमोर 'अर्धनग्न हलगी बजावो' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.




माजलगाव तालुक्यातील सुमारे १५ ते ३० गावांमध्ये राष्ट्रीय जलजीवन मिशनच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना राबवण्यात येत आहेत. मात्र या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप सामाजिक बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा प्रभारी अड.अमोल डोंगरे यांनी केला आहे. अनेक गावांमध्ये प्रत्यक्षात कामे न करता कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

या कथित गैरव्यवहाराच्या निषेधार्थ डोंगरे यांनी माजलगाव येथील ग्रामीण पाणीपुरवठा योजना उपविभाग कार्यालयासमोर अर्धनग्न अवस्थेत हलगी वाजवत आंदोलन केले. ◀◀ पान ३ वर

## गटनेते खुर्शीद आलम यांनी दोन दिवसीय सभा गाजवली

बीड । प्रतिनिधी

नगरपरिषदचे निवडणूका पार पडल्यानंतर बीड नगरपरिषदेची अर्थसंकल्पीय व सर्वसाधारण सभा दि.२७ फेब्रुवारीला सुरू होऊन २८ फेब्रुवारी रोजी संपली या दोन दिवसीय सर्वसाधारण सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदपवार चे गटनेते खुर्शीद आलम यांनी विकास कामांच्या अनुभवानुसार समाज हिताचे अनेक मुद्द्यांवर चर्चा करून विकासकामांच्या मागण्या केल्या यामध्ये नियमित पाणीपुरवठा करा, नियमित स्वच्छता करा, प्रत्येक विद्युत खंब्यावर लाईट लावा, सार्वजनिक ठिकाण म्हणजेच आठवडी बाजार, खासबाग अडक मार्केट, नवी भाजी मंडई, प्रकाश आंबेडकरनगर, सरकारी दवाखाना,

**शहरातील अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लागणार**



कंकालेश्वर मंदिर, शहंशाहवली दर्गा, वडार वाडा, किल्ला मैदान सह बीड शहरातील समशान भूम्या आणि कब्रस्तानात विंधन विहीर घेऊन सिमेंट टाक्या बसवून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, प्रभागाचे जनसंख्यानुसार विकास कामाला प्राधान्य द्यावे, मुदत संपलेल्या कॉम्प्लेक्स मधील गाड्यांच्या फेर लिलाव करावे, न.प.चे ओपन स्पेस वर गाळे काढून भाडेतत्त्वावर द्यावे, बोगस बिलांची विशेष लेखापरीक्षण झाल्या शिवाय गुत्तेदारांना बिले देण्यात येऊ नये, खासबाग ते मोमीनपुरा नदी पुलाचे काम त्वरित सुरू करावे, खासबाग आळत मार्केट रोड ते सफीलच्या बाजु बाजुने चांदणी चौकापर्यंत पुल बांधुन रस्ता करावे, मोमीन पुरा नालेला एका साइड ने रस्ता तर दुसर्या बाजुने नाला करावे, फुटे नल कडून धांडे नगर नर्सरी रोड वर येणारे पुराचे पाणी रेल्वे ब्रिज चे बाजुने बिंदू सुरा नदीत सोडावे तसेच शिंगणाचे डोंगरावरून मोमीन पुऱ्यात येणाऱ्या पुराचे पाणीला बार्शीनाका चौकाच्या बाजुने बिंदूसुरा नदीत सोडावे, बालेपिर नालेला संरक्षण भिंत बांधावे, आठवडी बाजारामुळे सुभाषरोड वर ट्राफिक जाम होतो म्हणून बाजाराला जागा उपलब्ध करावी, जुनी भाजी मंडई बुंदेलपुरा येथे शॉपिंग कॉम्प्लेक्स करावे, महात्माफुले मंडीतिल इमारतीच्या ठिकाणी भाजी मंडई सुरू करावे जेणेकरून मुख्य रस्त्यावर ट्राफिक होणार नाही, बोगस गुंटवारीला ◀◀ पान ३ वर

## विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी घेतली प्रभारी अधीकाऱ्यांची बैठक

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०६ मार्च पासुन विशेष पोलीस महानिरीक्षक संभाजीनगर परीक्षेत्र यांचे बीड जिल्हा पोलीस दलाचे वार्षीक तपासणी सुरु केली आहे. ज्यामध्ये दिनांक ०६ मार्च रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखांना भेट देवुन पोलीस मुख्यालय, मोटार परीवहन विभाग, स्थानीक गुन्हे शाखा, जिल्हा विशेष शाखा, दहशतवाद विरोधी शाखा, अनैतीक मानवी व्यापार प्रतिबंधक विभाग, दामिनी पथक, भरोसा सेल, शहर वाहतुक शाखा, आर्थीक गुन्हे शाखा, दोषसिद्धी विभाग, सायबर पोलीस ठाणे, बॉम्ब शोधक व नाशक विभाग, पोलीस दवाखाना येथे भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला.


तर दिनांक ०७ मार्च रोजी पोलीस दलाचा शिस्तीचा महत्वाचा भाग असलेल्या समारंभ कवायतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार पोलीस मुख्यालय येथे समारंभ कवायत त्यानंतर पिटी परेड, लाठी कवायत, सेन्ट्री ड्रील, स्वयंचलीत हत्यारांची कवायत, रायफल कवायत, बॅन्ड परेड, व दंगा काबु कवायत घेण्यात आली. सर्व प्रात्याक्षीकांबद्दल विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी समाधान व्यक्त केले. तसेच बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या कामासंबंधीच्या अडीअडचणी जाणुन घेण्यासाठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये मागील वर्षीच्या तपासणीवेळी अंमलदारांनी मांडलेल्या समस्या सोडविण्यासाठी केलेली कारवाई बाबत माहीती देण्यात आली. तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार व यांनी नव्याने मांडलेल्या समस्या/अडचणी ऐकुन घेवुन त्यांचे निराकरण करण्यात आले आहे. ◀◀ पान ३ वर



## दोन लाखांच्या कर्जमाफीवर समाधान नाही सरसकट कर्जमाफ करा -भाई गंगाभिषण थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

राज्य सरकारने आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली असली, तरी ही कर्जमाफी अपुरी असून सरकारने शेतकऱ्यांना भिजत घोंगडं ठेवले आहे, अशी टीका शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.



थावरे म्हणाले की, राज्यातील अनेक शेतकरी सध्या कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत. सरकारने दोन लाख रुपयांची मर्यादा घालण्याऐवजी शेतकऱ्यांचे आतापर्यंत असलेले संपूर्ण कर्ज एकदाच माफ करावे. केवळ मर्यादित कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांच्या समस्या सुटणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. मोठ्या उद्योगपतींची हजारो कोटी रुपयांची कर्जे माफ केली जातात, मात्र शेतकऱ्यांकडे थोडीशी थकबाकी असली तरी बँका वसुलीसाठी तगादा लावतात. या दबावामुळे अनेक शेतकरी ◀◀ पान ३ वर

## महादेव मुंडे खून तपास प्रकरणी खोटी माहिती पसरवल्यास कायदेशीर कारवाई ,पोलिसांचा इशारा

### खोटे आरोप करणाऱ्या राजाभाऊ फड यांच्यावर कारवाई होणार ?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात दोन वर्षांपूर्वी घडलेल्या आणि संपूर्ण राज्यभर गाजलेल्या महादेव मुंडे खून प्रकरणाच्या तपासाबाबत खोटी माहिती किंवा अफवा पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बीडच्या विशेष तपास पथकाने () प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

सदर प्रकरणातील तपास, विविध मानसशास्त्रीय चाचण्यांचे अहवाल व इतर तपासाशी संबंधित माहिती ही अत्यंत गोपनीय स्वरूपाची असून ती कुठेही प्रसिद्ध किंवा प्रसारित करण्यात आलेली नाही, तसेच ती प्रसारमाध्यमे किंवा सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आलेली नसल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, परळी शहरातील शरदचंद्र पवार गटाचे राजाभाऊ फड या कार्यकर्त्याने दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन महादेव मुंडे खून प्रकरणात काही लोकप्रतिनिधींवर बेछूट आरोप केले होते. हे आरोप करताना ब्रेन मॅपिंग व लाई डिटेक्टर चाचणीतून पुढे आलेली माहिती आपल्याला समजली असल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यामुळे या प्रकरणात मोठी खळबळ उडाली होती.

मात्र आता स्वतः पोलिसांनीच प्रसिद्धीपत्रक काढून या प्रकरणात स्पष्ट खुलासा केल्याने अशा प्रकारची माहिती अधिकृतपणे कोणालाही देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे खोटी माहिती देऊन अफवा पसरविणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे परळी शहर, जि. बीड येथे गुन्हा क्र. १९१/२०२३, भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध दिनांक २२ ऑक्टोबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या या गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक (), बीड यांच्या मार्फत सुरू आहे. तपासादरम्यान काही संशयित इसमांच्या पॉलीग्राफ (लाई डिटेक्टर), / ब्रेन मॅपिंग तसेच व्हॉईस ॲनालिसिस अशा मानसशास्त्रीय चाचण्या करण्यात आलेल्या आहेत. या चाचण्यांचे अहवाल अत्यंत गोपनीय स्वरूपाचे असून ते तपास यंत्रणेकडे सुरक्षित ठेवण्यात आलेले आहेत. हे अहवाल कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस, प्रसारमाध्यमांना किंवा सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आलेले नसल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अलीकडे या प्रकरणाबाबत विविध माध्यमांतून तसेच सोशल मीडियावरून अप्रमाणित माहिती व अफवा पसरवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणीही खोटी माहिती प्रसारित करत असल्यास त्यांच्यावर कायदेशीर तरतुदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. दरम्यान, सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक, बीड यांच्यामार्फत योग्य पद्धतीने व पारदर्शक कायदेशीर प्रक्रियेनुसार सुरू असून तपासाच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची सखोल पडताळणी करण्यात येत आहे, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# पाटोद्यात बसथांब्यावर निवाराशेडचा अभाव

## शाळकरी मुली व प्रवाशांना उन्हात पहावी लागते बसची वाट



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील पारगाव रोडवरील आण्णाभाऊ साठे चौक येथे बसथांब्यावर निवाराशेड नसल्यामुळे शाळकरी मुली, विद्यार्थी, महिला व प्रवाशांना कडक उन्हात उभे राहून बसची वाट पाहावी लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना देखील या ठिकाणी प्रवाशांसाठी कोणतीही मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.पाटोदा शहरातील पारगाव रोड हा अत्यंत वर्दळीचा मार्ग असून या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक, शेतकरी, कामगार तसेच शाळा व महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी प्रवास करतात. विशेषतः सकाळी व दुपारच्या वेळेस आण्णाभाऊ साठे चौक येथे बसची वाट पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत असते. मात्र या ठिकाणी बसण्यासाठी बाके, सावलीसाठी निवाराशेड किंवा पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे शाळकरी मुली व इतर प्रवाशांना कडक उन्हात उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे.उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तापमान मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने शाळकरी मुली, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे. काही वेळा बस उशिरा आल्यास प्रवाशांना २० ते ३० मिनिटे उन्हातच उभे राहावे लागते. त्यामुळे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# पुण्यात स्मशानभूमी बंद, पेट्रोल-डिझेलचे भाव वाढण्याची शक्यता; पंपचालकांना तेल कंपन्यांचा





पुणे । प्रतिनिधी

पश्चिम आशियातील वाढत्या युद्धजन्य तणावाचे पडसाद आता भारतातही उमटू लागले आहेत. इराण, इस्रायल आणि अमेरिकेमधील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्याचे थेट परिणाम महाराष्ट्रात, विशेषतः पुणे शहरात जाणवू लागले असून येत्या काही दिवसांत इंधन टंचाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पुण्यातील अनेक पेट्रोल पंपचालकांना तेल कंपन्यांकडून मेसेज पाठवण्यात आले आहेत. या मेसेजमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आगाऊ रक्कम जमा करण्यास सांगितले आहे. यापूर्वी पंपचालकांना सात ते आठ दिवसांचे क्रेडिट दिले जात होते. मात्र सध्याच्या परिस्थितीत कंपन्यांनी ही सवलत थांबवली असून आधी पैसे भरल्याशिवाय इंधन मिळणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शहरात पुढील काळात इंधनाच्या पुरवठ्यावर दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पुण्यात सीएनजी आणि एलपीजी गॅसच्या उपलब्धतेबाबत अडचणी निर्माण होत असल्याच्या तक्रारी समोर येऊ लागल्या आहेत. पश्चिम आशियातील तणावामुळे नैसर्गिक वायूचा पुरवठा विस्कळीत झाल्याची माहिती समोर येत आहे. काही ठिकाणी गॅस सिलेंडर मिळण्यास उशीर होत असल्याचे नागरिक सांगत आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. घरगुती गॅस सिलेंडरच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य कुटुंबांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. महिलांचे म्हणणे आहे की, गॅस, पेट्रोल, डिझेल आणि किराणा माल यांचे दर सतत वाढत आहेत; मात्र उत्पन्न त्याच प्रमाणात वाढत नाही. गॅस एजन्सीकडे वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारीही काही नागरिकांनी केल्या आहेत. कमर्शियल एलपीजी सिलेंडरच्या किमतीत अचानक १५० ते २०० रुपयांनी वाढ झाल्याने हॉटेल व्यावसायिकांनाही मोठा फटका बसला आहे. अनेक हॉटेल्समध्ये स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या गॅसचा पुरवठा अनियमित झाला आहे. त्यामुळे व्यवसाय सुरळीतपणे चालवणे कठीण होत असल्याचे हॉटेल मालक सांगत आहेत. गॅस पुरवठा कधी सुरळीत होईल याबाबत स्पष्ट माहिती नसल्यामुळे उद्योग क्षेत्रातही चिंतेचे वातावरण आहे. गॅस टंचाईचा परिणाम आता पुण्यातील अंत्यसंस्कार व्यवस्थेवरही दिसू लागला आहे. सदाशिव पेठ परिसरातील वैकुंठ स्मशानभूमीत गॅसवर चालणाऱ्या दाहिन्या सध्या बंद ठेवाव्या लागल्या आहेत. गॅस पुरवठा थांबल्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून या दाहिन्या वापरात नाहीत.

# पुणे-संभाजीनगर ग्रीनफिल्ड महामार्गा वरून ८ तासांचा प्रवास आता फक्त ४ तासांत



पुणे । प्रतिनिधी

गेली काही वर्षे प्रचंड चर्चेत असलेल्या ग्रीन फिल्ड मार्गासह उन्नत मार्गांना अखेर राज्य शासनाने शुक्रवारी सादर केलेल्या अर्थसंकल्पात प्रशासकीय मंजुरी मिळाल्याची घोषणा मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यात मुंबईच्या धर्तीवर पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर हे जिल्हे आगामी काळात विकासाचे ग्रोथ इंजिन कसे ठरतील, हेच त्यांनी सांगितले.

शुक्रवारी (दि. ६) राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुपारी २ ते ३.२५ असा तब्बल दीड तास सादर केला. यात त्यांनी राज्यातील सर्वच पायाभूत सुविधांच्या कामांची प्रशासकीय मान्यता झाल्याची घोषणा केली. मुंबई, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र या जिल्ह्यातील रस्त्याचे जाळे विस्तारून ते विकासात कसे निर्णायक ठरणार आहे, याचा रोड मॅप सादर केला. या सर्व विस्तारीकरणामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन इंधन बचत होईल. पर्यावरणाचा ऱ्हास कमी होऊन नागरिकांचा प्रवासाचा वेळ कमी होणार आहे. त्यामुळे मनस्तापही कमी होईल. याशिवाय उद्योगधंदे वाढीस चालना मिळणार आहे. याशिवाय विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांना पुण्याची कनेटिव्हिटी सहज सोपी आणि गतिमान होणार आहे.सध्या पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा मार्ग सर्वात खडतर आणि वेळेचा अपव्यय करणारा ठरत आहे. याबाबत उद्योजकांसह सामान्य नागरिकांच्या प्रचंड तक्रारी २०१४ पासून येत होत्या. त्यावर गेली काही वर्षे हा मार्ग सहापदरी करण्याचा प्रस्ताव वारंवार चर्चेला येत होता. त्यावर अखेर शिक्कामोर्तब होऊन प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर या १९२ किलोमीटर ग्रीन फिल्ड महामार्ग १४ हजार ८८६ कोटी रुपये खर्च करून सहापदरी केला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात पुणे ते शिरूर हा ५३ किलोमीटर लांबीचा उन्नत महामार्ग ७ हजार ५१४ कोटी रुपये खर्च करून तयार केला जाणार आहे. यामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर हे आठ तासांचे अंतर अवघ्या चार तासांत गाठणे शक्य होणार आहे.

# पुण्यात मोबाईल हिसकावणाऱ्या परप्रांतीय टोळीचा पर्दाफाश; आठ मोबाईल व चोरीची बाईक जप्त



पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरात मागील आठ ते दहा दिवसांपासून रस्त्यावर मोबाईलवर बोलत चालणाऱ्या नागरिकांचे मोबाईल हिसकावण्याच्या घटना वाढल्या होत्या. स्पोर्ट्स बाईकवर भरधाव वेगात येऊन क्षणार्धात मोबाईल हिसकावून आरोपी पसार होत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

अखेर पर्वती पोलिसांनी सखोल तपास करत चार जणांच्या परप्रांतीय टोळीचा पर्दाफाश केला असून त्यांच्याकडून आठ मोबाईल फोन आणि चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

अर्जुन कमलेश सरोज (वय १८, रा. आंबेगाव पठार, मूळ प्रयागराज, उत्तर प्रदेश), इमरान शफीक शेख (वय १८, रा. उंड्री चौक, मूळ साहेबगंज, झारखंड), रवीकुमार राजेंद्रकुमार ( २१, रा. उंड्री चौक, मूळ प्रयागराज, उत्तर प्रदेश) आणि प्रदीपकुमार महेंद्रकुमार (वय २१, रा. आंबेगाव पठार, मूळ रायबरेली, उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

यामध्ये एका अल्पवयीन मुलाचाही समावेश होता. या प्रकरणात पर्वती पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल हिसकावण्याचे दोन गुन्हे दाखल झाले होते. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिस हवालदार प्रकाश मरगजे यांनी तपास सुरू केला.

तपासादरम्यान एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात आरोपींची मोटारसायकल दिसून आली. तसेच त्या गाडीवर भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रिपल सीट प्रवासाबद्दल वाहतूक चलनही कापण्यात आले होते. या धाग्यांवरून पोलिसांनी गाडीचा माग काढत उंड्री चौक गाठला आणि तेथून मुख्य आरोपी इमरानसह तीघांना ताब्यात घेतले. त्यांच्या चौकशीत समजले की, इमरान शेख हा सुमारे पंधरा दिवसांपूर्वी मुंबईतून एक नवी दुचाकी चोरी करून पुण्यात आला होता. तो उंड्री येथे त्याचा मित्र रवीकुमार याच्यासोबत मजुरीचे काम करत राहत होता. इतर तीन आरोपी भारती विद्यापीठ परिसरातील एका हॉटेलमध्ये काम करत होते. रवीकुमारच्या माध्यमातून त्यांची ओळख झाली. इमरानने दोन मोबाईल हिसकावल्याचे उघड झाले असून दोन्ही वेळा त्याने ट्रिपल सीट येऊन चोरी केली होती. प्रत्येक वेळी त्याने सोबतचा एक पार्टनर बदलला होता. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-२) मिलिंद मोहिते, सहायक पोलीस आयुक्त धन्यकुमार गोडसे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) अनिता हिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक किरण पवार, हवालदार प्रकाश मरगजे, महेश मंडलिक तसेच पोलीस कर्मचारी सुर्या जाधव, मनोज बनसोड, नानासो खाडे, सद्दाम शेख, अमित चिव्हे, अमोल दबडे, राकेश सुर्वे आणि पोलीस मित्र दिनेश परिहार यांनी सहभाग घेतला.

# सहकारनगर पोलिसांकडून दुय्यम निबंधकांना चौकशीसाठी समन्स; बनावट कागदपत्रांवरून दस्त नोंदणी प्रकरण




पुणे । प्रतिनिधी

तळवडे येथील एका सदनिकेच्या असाईनमेंट डीड नोंदणीवेळी बनावट कागदपत्रे जोडल्याचा संशय व्यक्त होत असल्याने सहकारनगर पोलिसांनी दुय्यम निबंधकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. या प्रकरणी दस्त नोंदणी अधिनियम १९०८ च्या कलम ८२ अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे तळवडे येथील गट क्रमांक १६७ मधील शिवप्रिया अपार्टमेंटमधील सदनिका क्रमांक २०३ (बिल्टअप क्षेत्र ५६० चौ.फुट व कार्पेट क्षेत्र ३८१ चौ.फुट) या मिळकतीचा असाईनमेंट डीड (दस्त क्र. ३९३४/२०२६) ६ फेब्रुवारी २०२६ रोजी नोंदविण्यात आला होता. या दस्त नोंदणीवेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा बांधकाम सुरू करण्याचा दाखला तसेच पूर्णत्वाचा दाखला जोडण्यात आल्याचे नमूद आहे.

मात्र, प्राथमिक तपासात हे दाखले बनावट असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याबाबत दाखल झालेल्या तक्रार अर्जाच्या आधारे सहकारनगर पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणात लिहून देणारे शंकर रघुनाथ गोकुळे, तसेच दस्त नोंदणीवेळी संबंधित व्यवहारात सहभागी असलेले साहिल विठ्ठल फल्ले, योगिता राजू पाटील आणि राजू शिवाजी पाटील यांच्याविरोधात शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) अनिल गायकवाड यांना सहकारनगर पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित राहण्याचे समजपत्र देण्यात आले . त्यांना दस्त क्रमांक ३९३४/२०२६ ची साक्षांकित प्रत, तक्रार देण्यासाठी मिळालेल्या अधिकाराचे आदेश आणि संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यास सांगितले दरम्यान, ६ मार्च रोजी दुपारी ३ वाजता सहकारनगर पोलीस स्टेशन येथे चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. या चौकशीसाठी संबंधित अधिकारी उपस्थित राहिले होते, त्यामुळे दस्त नोंदणीचे कामकाज बंद होते, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# विनयभंग करणारा तरुण निघाला एमपीएससी चा विद्यार्थी, शिवाजीनगर पोलिसांनी ठोकल्या बेड्या



पुणे । प्रतिनिधी

पुण्यात शिवाजीनगर भागात एका तरुणीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. विनयभंग करणारा तरुण हा एमपीएससी करणारा विद्यार्थी असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. तू खूप सुंदर दिसते म्हणत पोर्टर डिलिव्हरी बॉयने शिवाजीनगर परिसरातील एका तरुणीचा विनयभंग केला होता. त्यानंतर तरुणीने डिलिव्हरी बॉय विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

दरम्यान, पोलिसांनी रात्रीच या आरोपीचा शोध घ्यायला सुरुवात केली. सीसीटीव्ही फुटेज गाडीचा नंबर आणि पोर्टर प मध्ये दिलेले डिटेल्स हे सगळं तपासून २४ तासाच्या आत आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. श्रीधर कांबळे असं या आरोपीचे नाव आहे. पुण्यातील शुक्रवार पेठेतील शिवाजीनगर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. श्रीधर हा मूळचा कराडचा राहणारा आहे. मागील काही वर्षांपासून पुण्यात शुक्रवार पेठेत राहून एमपीएससीचा अभ्यास करत होता. रिकाम्या वेळात पोर्टरच काम करायचा. पुण्यातील शिवाजीनगर परिसरात राहणाऱ्या एका तरुणीने पोर्टर पवरून सामान बोलवले होते. हे सामान घेण्यासाठी तरुणीने दरवाजा उघडला आणि पार्सल घेतलं. मात्र त्यानंतर डिलिव्हरी बॉयने तरुणीकडे पाण्याची मागणी केली. तरुणीने डिलिव्हरी बॉयला पाणी दिले. यावेळी डिलिव्हरी बॉयने तरुणीच्या हाताला स्पर्श केला आणि तिला खूप सुंदर दिसतेस, असं म्हटलं होतं. ६ मार्चला संध्याकाळी पावने पाच वाजता तरुणीच्या घरी ही घटना घडली. यावेळी तरुणीच बाळ आणि सासू घरात होते. घडलेला सगळा प्रकार पतीला सांगितला आणि थेट शिवाजीनगर पोलीस स्टेशन गाठलं. पमधील सगळे डिटेल्स पोलिसांना दिले. तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी श्रीधर कांबळे याच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल केला होता.

## पुण्यातील बिबट्यांना वनतारात हलवलं; वन्यजीव रुग्णवाहिकेतून पहिल्या टप्प्यात २० बिबट गुजरातला रवाना

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील वाढती बिबट्यांची संख्या मनुष्यवस्तीसाठी जीवेघेणी ठरत असल्याचं चित्र गेल्या काही महिन्यात दिसून आलं. त्यामुळे, शासनापुढे पुणे जिल्ह्यातील बिबट्यांच्या वाढत्या संख्येचा आणि माणसांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्याच अनुषंगाने पुण्यातील बिबट्यांना गुजरातमधील वनतारा येथे हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडून राज्य सरकार आणि वनतार यांच्यात करारही झाला होता. त्यानुसार, आता येथील ५० बिबट्यांना वनतारामध्ये हलविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार, जुन्नर तालुक्यातील माणिकडोह येथून २० बिबटे गुजरातमधील वनतारा येथे हलविण्यात आले आहेत.

जिल्ह्याच्या जुन्नर वनविभागाच्या हद्दीत मानव-बिबट संघर्षाच्या घटनांमध्ये मागील काही वर्षांत मोठी वाढ झाल्याने पकडण्यात आलेल्या बिबट्यांचे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार आज (७ मार्च) रोजी पहिल्या टप्प्यात २० बिबट्यांना गुजरातमधील वनतारा केंद्रात हलविण्यात आले. मानव-बिबट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जुन्नर व शिरूर तालुक्यातील काही बिबट्यांना पकडून त्यांना माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे ठेवण्यात आले होते. मात्र, या केंद्राची क्षमता ५० इतकी मर्यादित असल्याने अतिरिक्त बिबट्यांचे इतर योग्य ठिकाणी स्थलांतर करणे आवश्यक झाले होते.

# हडपसर पोलिसांना दणका! कारणे न देता केलेली अटक अवैध; आरोपीस तात्काळ मुक्त करण्याचे न्यायालयाचे आदेश



पुणे । प्रतिनिधी

खंडणीतील आरोपीला अटक करताना कारणे न देणे हडपसर पोलिसांना महागात पडले आहे. आरोपीची तात्काळ मुक्तता करण्याचे आदेश लष्कर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी योगेंद्र कवडे यांनी दिले आहेत.

या प्रकरणात बचाव पक्षातर्फे ड. अजित पवार आणि ड प्रणित नामदे यांनी काम पाहिले. त्यांना ड. वेदांत म्हैसकर आणि ड. अक्षय नामदे यांनी सहकार्य केले.अमोल राजपूत असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या विरोधात खंडणी आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याच्या कलमानुसार हडपसर पोलीस स्टेशन येथे ५ मार्च २०२६ रोजी गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात त्याला अटक करून पोलिसांनी ६ मार्च रोजी लष्कर न्यायालयात कोठडीसाठी हजर केले.त्यावेळी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२ (१) नुसार आरोपी आणि त्याच्या नातेवाईकांना अटक करताना लिखित स्वरूपात कारणे देणे बंधनकारक आहे. हा आरोपीचा मूलभूत अधिकार आहे.या प्रकरणात पोलिसांनी कायद्याने घालून दिलेल्या कुठल्याही निकषांची पूर्तता केलेली नाही, ही बाब आरोपीचे वकील ॲड. अजित पवार आणि ड प्रणित नामदे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. तर आरोपी विरोधात खुनासह विविध स्वरूपाचे इतर २२ खटले प्रलंबित असल्याचा युक्तिवाद सरकार पक्षातर्फे करण्यात आला. मात्र, न्यायालयाने बचाव पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीला तात्काळ मुक्त करण्याचे आदेश दिले.

# जिल्हा व्यवस्थापक व सहायक लेखा अधिकाऱ्याला लाच प्रकरणात अटक

पुणे । प्रतिनिधी

फोटोग्राफी व्यवसायाकरिता कॅमेरा खरेदीसाठी मिळणाऱ्या ५० हजार रुपयांच्या अनुदानासाठी १५ हजार रुपये लाच घेणारा महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचा जिल्हा व्यवस्थापक आणि सहायक लेखा अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने (एसीबी) अटक केली आहे.

मागासवर्गीयांना व्यवसायासाठी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाकडून ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. हे अनुदान मिळावे, म्हणून एकाने अर्ज केला होता. ती फाईल मंजूर करून विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यासाठी ही लाच घेण्यात आली आहे. जिल्हा व्यवस्थापक महेंद्र मलेशा माने (वय ५६, रा. पी जी बॉईज हॉस्टेल, पुणे-आळंदी रोड, विश्रांतवाडी, मूळ रा. सोलापूर), सहायक लेखा अधिकारी संतोष नामदेव शिंदे (वय ५५, रा. सनगौरी अपार्टमेंट, कुंबरे टाऊनशिप, कोथरूड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

एसीबीच्या माहितीनुसार, तक्रारदार हे फोटोग्राफर असून, त्यांना व्यवसायासाठी ३ लाख रुपयांचा कॅमेरा खरेदी करायचा होता. त्यासाठी त्यांनी एका बँकेत कर्जासाठी अर्ज केला होता. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाकडून मागासवर्गीय लोकांना व्यवसायासाठी ५० हजार रुपये अनुदान देण्यात येते. त्यासाठी तक्रारदाराने सप्टेंबर २०२५ मध्ये अर्ज केला होता. महेंद्र माने हे जिल्हा व्यवस्थापक आहेत. सतोष शिंदे हे सहायक लेखा अधिकारी असून, महामंडळाकडे लाभार्थींनी दाखल केलेल्या प्रकरणांत साईट व्हिजिट करून लाभार्थींकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन जिल्हा व्यवस्थापक महेंद्र माने यांच्या शिफारशीनंतर ते प्रकरण अनुदान मंजुरीसाठी महामंडळाच्या विभागीय कार्यालयात पाठविण्याचे काम करतात. दरम्यान, या दोघांनी तक्रारदाराने दाखल केलेल्या अनुदानाचे प्रकरण सकारात्मक शिफारशीसह महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाच्या विभागीय कार्यालयात पाठविण्यासाठी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. मात्र, तक्रारदाराने ३० जानेवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला तक्रार केली. त्याची ४ व ५ फेबुवारी रोजी पडताळणी करण्यात आली. तडजोडीअंती १५ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

जे लाचखोरांना ९ मार्चपर्यंत पोलिस कोठडी

लाचखोरांना पकडण्यासाठी ५ मार्चला सायंकाळी रास्ता पेठेतील आपोलो चौकातील कॅफेसमोर सापळा रचण्यात आला. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता तक्रारदाराकडून १५ हजारांची लाच स्वीकारताना संतोष शिंदेला पकडण्यात आले. त्यानंतर महेंद्र मानेला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. दोघांना शुक्रवारी विशेष न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने ९ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक प्रसाद लोणारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. याप्रकरणी अधिक तपास पोलिस निरीक्षक खंडेराव रंजवे करीत आहेत.

# दीपस्तंभ मनोबल प्रकल्पातील १९ विद्यार्थ्यांचे यूपीएससीमध्ये यश



पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) घेतलेल्या २०२५ च्या नागरी सेवा परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून, दीपस्तंभ फाउंडेशनच्या 'मनोबल' प्रकल्पातील १९ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे या यशस्वी विद्यार्थ्यांपैकी ८ विद्यार्थी हे दिव्यांग असून, हे त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहेत. मनोबलचा विद्यार्थी असलेला दृष्टिबाधित रवी राज यांनी दिव्यांग उमेदवारांमध्ये देशात अव्वल ठरत देशात २० वा क्रमांक ( अखठ २०) मिळवला आहे.

दीपस्तंभ फाउंडेशनच्या 'मनोबल' या राष्ट्रीय प्रकल्पात पुणे, जळगाव आणि दिल्ली येथे विद्यार्थ्यांना स्टडी मटेरियल, क्सेसिबल शिक्षण, तंत्रज्ञानाधारित सुविधा आणि विशेष समुपदेशनाच्या माध्यमातून सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, अशा विविध प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजांनुसार या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. देशातील १६ राज्यांमधील ६०० विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षांसाठी विनामूल्य शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.या विद्यार्थ्यांना ज्ञानेश्वर मुळे, कुणाल कुमार, सुप्रिया देवस्थळी, आयुषी डबास, विश्वजित यादव आणि मिलिंद पाटील (विभाग प्रमुख- मनोबल) यांच्यासह ४० अधिकाऱ्यांच्या टीमने मार्गदर्शन केले, अशी माहिती मनोबलचे कॅडमिक हेड अमोल लंके यांनी दिली.

दीपस्तंभ मनोबलच्या या यशाबद्दल बोलताना संस्थापक यजुर्वेन्द्र महाजन म्हणाले, दिव्यांग विद्यार्थ्यांचे नागरी सेवा परीक्षेतील हे देदीप्यमान यश समस्या क्षमतेची नसून, संधी आणि प्रणालीची असते ही बाब सिद्ध करते, असे मला वाटते. संविधानाने अपेक्षित समान संधी, सुलभ शिक्षण आणि योग्य मार्गदर्शन दिल्यास दिव्यांग युवक-युवती विकसित भारताचे नेतृत्व करू शकतात.

यशस्वी विद्यार्थ्यांपैकी रेणुका केकण म्हणाल्या, मी २०२३ पासून दीपस्तंभ फाउंडेशनच्या मनोबल प्रकल्पाशी जोडलेली असून, येथे निवासी विद्यार्थी म्हणून तयारी करत होते. वैयक्तिक मार्गदर्शन, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण आणि सतत प्रेरणा देणारे शैक्षणिक पाठबळ यामुळे यूपीएससीसारख्या परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यावर मला योग्य दिशा आणि आत्मविश्वास मिळाला.